- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४८,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,३६,३५० /-
✔ चांदी : २,४३,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शुक्रवार, २३ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ८ | वर्ष : १ | अंक : ३१३ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

थोडक्यात

आगीत दोघांचा मृत्यू, चौघे गंभीर

मुंबई : अंधेरी पूर्व येथील साकीनाका, खैराणी रोडवरील एका व्यावसायिक व निवासी संकुलाला मंगळवारी सायंकाळी लागलेल्या भीषण आगीत दोन जणांचा होरपळून मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले. जखमींवर घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न करून मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास ही भीषण आग आटोक्यात आणली. खैराणी रोडवरील अब्दू रशीद कंपाऊंडमधील तळमजला अधिक एक मजली गाळे व चाळींमध्ये मंगळवारी सायंकाळी सव्वासहाच्या सुमारास आग भडकली. सुरुवातीला काही दुकानांपुरती मर्यादित असलेली ही आग बघता-बघता सुमारे ६० ते ७० व्यावसायिक गाळे आणि घरांमध्ये पसरली.

सामायिक सातबारा उताऱ्यावरील जमीन विकण्यासाठी संमती आवश्यक

महाराष्ट्रात सामायिक सातबारा जमिनीच्या विक्रीचे नियम

वृत्तसंस्था, मुंबई

सामायिक सातबारा उताऱ्यावर नोंद असलेल्या जमिनींच्या खरेदी-विक्री व्यवहारांमध्ये पारदर्शकता वाढवण्यासाठी आणि सहहिस्सेदारांची फसवणूक रोखण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडून महत्त्वाची पावले उचलण्यात आले आहे. सामायिक मालमत्तेच्या विक्री व्यवहारात संबंधित सहहिस्सेदारांची संमती आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी यांना महत्त्व देण्यात येणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून जमिनींच्या व्यवहारांमधील अनियमितता रोखण्यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागात अनेकदा एकाच सातबारा उताऱ्यावर अनेक व्यक्तींची नावे असतात. वारसाहक्काने मिळालेली जमीन, कुटुंबाची सामायिक मालमत्ता किंवा अद्याप अधिकृत वाटणी न झालेली जमीन अशा प्रकारांत ही परिस्थिती दिसून येते. अशा जमिनींच्या खरेदी-विक्रीच्या वेळी संबंधित व्यक्तींचे हक्क, प्रत्यक्ष हिस्सा आणि उपलब्ध महसुली नोंदी तपासणे महत्त्वाचे ठरते. काही प्रकरणांमध्ये सहहिस्सेदारांना विश्वासात न घेता किंवा त्यांच्या हक्कांबाबत स्पष्टता नसताना व्यवहार करण्याचे प्रयत्न होऊ शकतात. त्यामुळे भविष्यात मालकी हक्कावरून वाद निर्माण होणे, न्यायालयीन लढाईला सामोरे जाणे किंवा आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते. ही जोखीम कमी करण्यासाठी व्यवहारापूर्वी आवश्यक कागदपत्रे आणि संबंधितांची संमती तपासण्यावर भर दिला जात आहे.



सामायिक सातबारा असलेल्या जमिनीच्या विक्री व्यवहारात संबंधित सहहिस्सेदारांचे ना हरकत प्रमाणपत्र अर्थात एनओसी आवश्यक असल्याची तरतूद या निर्णयाच्या माहितीत नमूद करण्यात आली आहे. त्यामुळे व्यवहार करणाऱ्या व्यक्तीला जमिनीवरील स्वतःच्या हक्कापुरतीच विक्री करता येते की संपूर्ण मालमत्तेच्या व्यवहारासाठी इतरांचीही संमती आवश्यक आहे, हे स्पष्ट करण्यास मदत होईल. सहहिस्सेदारांची संमती आणि हक्कांची पडताळणी झाल्यास एका व्यक्तीने संपूर्ण जमिनीवर स्वतःचा अधिकार असल्याचे भासवून व्यवहार करण्याची शक्यता कमी होऊ शकते. मात्र, कोणत्या प्रकारच्या व्यवहारासाठी किती सहहिस्सेदारांची संमती आवश्यक असेल, हे लागू कायदे, मालकीची स्थिती आणि शासनाच्या अधिकृत आदेशातील अटींनुसार ठरेल.

या प्रक्रियेत भूमिअभिलेख विभागाची 'क' प्रत महत्त्वाची ठरणार आहे. जमिनीच्या मोजणीशी संबंधित नोंदी, क्षेत्रफळ आणि हद्दींबाबतची माहिती तपासण्यासाठी भूमिअभिलेख विभागाच्या अभिलेखांचा उपयोग होतो. संबंधित जमिनीच्या कागदपत्रांची पडताळणी करून विक्रीसाठी प्रस्तावित केलेले क्षेत्र आणि प्रत्यक्ष अभिलेख यांच्यातील सुसंगती तपासणे आवश्यक ठरू शकते. महाराष्ट्र शासनाच्या महाभूमी पोर्टलवर डिजिटल सातबारा, आठ-अ, फेरफार उतारे, मालमत्ता पत्रक आणि 'क' प्रत यांसारख्या भूमिअभिलेख सेवांची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे व्यवहारापूर्वी संबंधित नोंदींची अधिकृत कागदपत्रांशी पडताळणी करण्यास मदत मिळू शकते.

सामायिक मालमत्तेच्या व्यवहारात आवश्यक संमती, परवानग्या किंवा इतर बंधनकारक कागदपत्रे उपलब्ध नसल्यास दस्त नोंदणी रोखण्याची भूमिका या निर्णयाच्या माहितीत स्पष्ट करण्यात आली आहे. यामुळे केवळ व्यवहार करणा-या व्यक्तीच्या दाव्यावर अवलंबून न राहता संबंधित कागदपत्रांची तपासणी करण्याला महत्त्व मिळणार आहे. विशेषतः जमिनीचे क्षेत्रफळ, मालकी हक्क, सहहिस्सेदारांचे अधिकार आणि आवश्यक परवानग्या यांमध्ये विसंगती आढळल्यास व्यवहाराबाबत अधिक दक्षता घेणे अपेक्षित आहे. यामुळे संशयास्पद व्यवहारांना प्रतिबंध घालण्यास आणि भविष्यातील मालमत्ता वाद कमी करण्यास मदत होऊ शकते.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून जमिनींच्या व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणणे, बेकायदेशीर किंवा अनियमित व्यवहारांना आळा घालणे आणि नागरिकांचे मालमत्तेवरील हक्क सुरक्षित ठेवणे यावर भर दिला जात आहे. जमिनीच्या व्यवहारात फसवणूक झाल्यानंतर नागरिकांना महसूल कार्यालये आणि न्यायालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी व्यवहाराच्या सुरुवातीलाच कागदपत्रांची पडताळणी महत्त्वाची ठरणार आहे. सामायिक सातबारा असलेल्या जमिनींच्या विक्री व्यवहारात सहहिस्सेदारांची संमती, भूमिअभिलेखाची पडताळणी आणि वैध कागदपत्रांची पूर्तता यांना महत्त्व दिल्यास जमीन व्यवहार अधिक सुरक्षित आणि पारदर्शक होण्यास मदत होऊ शकते.

तिबेटमध्ये ७.० रिश्टर स्केलचा शक्तिशाली भूकंप

मोठ्या प्रमाणात वित्त व जीवितहानी झाल्याची शक्यता



वृत्तसंस्था, तिबेट

एक मोठी बातमी समोर येत आहे. तिबेटमध्ये मोठा भूकंप झाल्याची घटना घडली आहे. भूकंप झालेला प्रदेश हा चीनच्या ताब्यात आहे. मिळालेल्या माहितीनुसार ७.० रिश्टर स्केलचा मोठा भूकंपाचा धक्का बसला आहे. मोठी वित्त व जीवित हानी झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. आठ वाजून तीन मिनिटांनी हा भूकंपाचा धक्का बसला आहे. मिळालेल्या माहिती भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीखाली १७३ किलोमीटर खोल होता. दरम्यान, बाधित भागांमध्ये मदत आणि बचाव कार्य सुरू करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

यापूर्वी ८ सप्टेंबर रोजी भारताचा शेजारी देश नेपाळमध्ये भूकंप झाला होता. तिबेट आणि नेपाळच्या आसपासचा प्रदेश भूकंपप्रवण मानला जातो. २६ ऑगस्ट रोजी नेपाळ-तिबेट सीमेजवळ भूस्खलनामुळे मोठा पूर आला होता, ज्यामध्ये घरे, रस्ते आणि पूल वाहून गेले. यात शेकडो लोकांचा मृत्यू झाला आणि अनेक जण बेपत्ता झाले. तेव्हापासून बाधित भागांमध्ये मदत आणि बचाव कार्य सुरू आहे.

२०२५ मध्ये, तिबेटमध्ये ७ तीव्रतेचा भूकंप झाला, ज्यात सुमारे १०० लोकांचा मृत्यू झाला आणि १००० घरांचे नुकसान झाले. भूकंपाचा केंद्रबिंदू माउंट एव्हरेस्टच्या ईशान्येला अंदाजे ७५ किलोमीटर अंतरावर आणि नेपाळच्या जवळ होता. युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सर्व्हे नुसार, गेल्या शतकात प्रभावित क्षेत्रात ६ तीव्रतेचे किमान १० भूकंप झाले आहेत.

तिबेट प्रदेशात भूकंप का होतात ?

तिबेट प्रदेश त्याच्या भूकंपीय हालचालींसाठी ओळखला जातो. हे भारतीय आणि युरेशियन टेक्टॉनिक प्लेट्सच्या टक्करीमुळे होते, ज्यातून हिमालयाची निर्मिती झाली. ऐतिहासिक आकडेवारी दर्शवते की या प्रदेशात अनेक भूकंपीय हालचाली झाल्या आहेत, ज्यामुळे तो सर्वात जास्त भूकंपीय सक्रिय प्रदेशांपैकी एक बनला आहे.



पदवीधरांनो करा संकल्प.. सुधाकर कोहळेच.. एकमेव विकल्प..!

नागपूर विभाग पदवीधर मतदार संघातील,
भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले), पि.रि.पा. यांचे अधिकृत उमेदवार
सुशिक्षीत, सुसंस्कृत, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ता



सुधाकर विठ्ठलराव कोहळे

सुधाकर विठ्ठलराव कोहळे
B.Sc., B.Ed., (Mathematics)
माजी उपमुख्याध्यापक पं. बच्छराज व्यास विद्यालय, नागपूर

- माजी अध्यक्ष, भाजपा नागपूर जिल्हा
- माजी अध्यक्ष, भा.ज.पा. नागपूर शहर
- अध्यक्ष, मिनीगोल्फ फेडरेशन ऑफ इंडिया
- अध्यक्ष, स्पोर्टस् तायक्वॉंडो असोसिएशन, नागपूर
- आमदार (2014-19) दक्षिण नागपूर (महाराष्ट्र)
- माजी नगरसेवक म.न.पा. नागपूर
- माजी विश्वस्त ना.सु.प्र. नागपूर
- अध्यक्ष, सूर्योदय लोकसेवा प्रतिष्ठान, नागपूर

1 यांना पहिल्या पसंतीचे मत देवून प्रचंड बहुमताने विजयी करा

मतदान : शुक्रवार, दि. २३/१०/२०२६
वेळ : सकाळी ८ ते सायं. ४ पर्यंत

उमेदवाराचे नाव Name of Candidate		सलग्न पक्ष Party Affilation	पसंती क्र. Preference
सुधाकर विठ्ठलराव कोहळे Sudhakar Vitthalrao Kohle		भारतीय जनता पार्टी Bharatiya Janata Party	1

हेल्पलाईन क्रमांक 8421824611 8999744253

1 गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि कौशल्य विकास
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करणे
- इंडस्ट्री-रेडी प्रशिक्षण देणे
- ग्रंथालये व लर्निंग सेंटर उपलब्ध करणे

2 रोजगार आणि करिअर संधी
- नियमित रोजगार मेळाव्याचे आयोजन
- कॅम्पस ते कॉर्पोरेट जोडणी करणे
- स्टार्टअप व स्वयंरोजगार प्रोत्साहन देणे

3 नवीनम्रेष, तंत्रज्ञान आणि डिजिटल सक्षमता
- AI, डेटा ॲनॅलिटिक्स प्रशिक्षण देणे
- ऑनलाइन प्लॅटफॉर्म व ई-लर्निंग सेवा उपलब्ध करणे
- रोजगार निर्मिती

4 महिला पदवीधरांसाठी विशेष उपक्रम
- उद्योग जगतात नेतृत्व विकास मार्गदर्शन व्यवस्था करणे
- सुरक्षितता, सन्मान व सहायक कार्य परिसराचे नियोजन करणे
- आरोग्य, कायदेशीर मदत व सल्ला
- महिला नेटवर्क व मेंटरिंग मंच

5 गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि कौशल्य विकास
- नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोलीतील पदवीधरांना प्राधान्य
- ग्रामीण व दुर्गम भागातील रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी प्रयत्न करणार

6 पदवीधरांना सशक्त संवाद व सहभाग
- सर्व पदवीधरांशी संवादासाठी विविध कार्यशाळांचे आयोजन करणार
- स्थानिक उद्योग, महाविद्यालये व रोजगार संस्थांशी समन्वय साधणे

7 पारदर्शक, जनमिमूख आणि उत्तरदायी व्यवस्था
- विधान परिषदेत पदवीधरांच्या समस्या व प्रश्न शक्तीने मांडणार
- प्रशासन आणि शिक्षण संस्थेशी समन्वय साधणे.

8 जागतिक संधीसाठी तयार पदवीधर
- परदेशी शिक्षण फेलोशीप व आंतरराष्ट्रीय रोजगारासाठी मार्गदर्शन
- इंडस्ट्री कनेक्ट व इंटर्नशिप
- स्कील व ॲन स्कील्ड पदवीधरांसाठी रोजगाराची नवी दालने उघडणार

भारतीय जनता पार्टी व महायुतीचे सर्व आजी-माजी अध्यक्ष, महापौर, उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्ष, सत्तापक्ष नेते, सभापती, मंडळ अध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका, नोंदणी प्रमुख सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते गण.

मतदानासाठी जाताना मतदान कार्ड / आधार कार्ड / ड्रायव्हिंग लायसन्स / पॅन कार्ड किंवा कोणतेही अधिकृत शासकीय ओळखपत्र सोबत ठेवावे.

प्रकाशक : सुधीर दिवे । गिरीश देशमुख

दैनिक सिंहवाणी वृत्त Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : शुक्रवार, २३ ऑक्टोबर २०२६

संपादकीय लेखणीतून...

भारत आणि अमेरिका करार

भारत आणि अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय व्यापार करारासंदर्भात महत्त्वपूर्ण घडामोडी घडत आहेत. दोन्ही देश करारच्या अंतिम टप्प्याजवळ पोहोचल्याचे संकेत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिले आहेत. भारताला अमेरिकेसोबत व्यापार करार करण्याची इच्छा असून आता होणारा करार हा या पूर्वी झालेल्या करारापेक्षा वेगळा असेल, असे ते म्हणाले. अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो भारत दौऱ्यावर असून व्यापारासह ऊर्जा, तंत्रज्ञान, संरक्षण आणि दोन्ही देशातील नागरिकांमधील संबंध अधिक मजबूत करण्यावर चर्चा सुरू आहे. रुबियो यांनी मंगळवारी बोलताना करार अंतिम करण्यासाठी मोजकेच मुद्दे चर्चेसाठी शिल्लक असल्याचे सांगितले. उर्वरित प्रश्न लवकर सुटल्यास कराराची घोषणा होऊ शकते आणि त्यानंतर दोन्ही देशांचे नेते त्यावर स्वाक्षरी करण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर वाणिज्यमंत्री पियुष गोयल यांनी या महिन्याच्या सुरुवातीला मिलवॉकी आणि वॉशिंग्टन येथे अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी जेमिसन ग्रीर यांची भेट घेऊन करारातील विविध तरतुदींवर चर्चा केली होती. भारत आणि अमेरिकेने फेब्रुवारीमध्ये द्विपक्षीय व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्याच्या आराखड्याला अंतिम स्वरूप दिल्याची घोषणा केली होती; मात्र अमेरिकेच्या शुल्कविषयक धोरणांमध्ये झालेल्या बदलांमुळे पुढील वाटाघाटी कराव्या लागल्या.

भारत-अमेरिकेतील करारासंदर्भात दोन्ही बाजूंकडून सकारात्मक संकेत मिळत आहेत. भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी नवी दिल्लीतील ब्लूमबर्ग न्यू इकॉनॉमी फोरममध्ये बोलताना महत्त्वाचे मुद्दे मार्गी लागले असून करार लवकरच लागू करण्याच्या दिशेने दोन्ही देश पुढे जात असल्याचे सांगितले. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनीही चर्चेच्या निष्पत्तीबाबत आशावाद व्यक्त केला आहे. गेल्या आठवड्यात ट्रम्प प्रशासनाने रशियन निर्यातीशी संबंधित काही निर्बंध आणि शुल्क हटविण्याचा निर्णय घेत भारताला दिलासा दिला होता. ट्रम्प यांनी स्वाक्षरी केलेल्या कायद्यानुसार हे निर्बंध आणि शुल्क लागू होणार होते;मात्र, शुक्रवारी रात्री जारी केलेल्या कार्यकारी आदेशाद्वारे त्यांनी ग्रॅहम कायद्यातंर्गत लादलेले निर्बंध शुल्क रद्द केले. या संदर्भात अमेरिकेच्या राष्ट्रीय हिताचा विचार करून हा निर्णय घेतल्याचे ट्रम्प यांनी म्हटले होते. व्यापार करारासंदर्भातची चर्चा अंतिम टप्प्यात असल्याचे संकेत मिळत असले तरी करारच्या अंतिम अटी आणि त्याचे नेमके स्वरूप अद्याप स्पष्ट झालेले नाही. अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांच्या भारत दौ-याला मंगळवारी मुंबईत सुरुवात झाली. रुबियो आणि भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्यात मुंबईतील ताजमहल पॅलेस येथे महत्त्वाची द्विपक्षीय बैठक झाली.

या बैठकीत व्यापार, ऊर्जा, संरक्षण, तंत्रज्ञान आणि दोन्ही देशांमधील संबंधावर चर्चा झाली. बैठकीला भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री आणि भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जियो गोर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत बोलताना रुबियो म्हणाले, हा करार अंतिम करारच्या अगदी जवळ पोहोचला असून काही मोजके मुद्दे बाकी आहेत त्यामुळे लवकरच कराराबाबत चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे. भारताच्या ऊर्जा धोरणावरही रुबियो यांनी भाष्य केले.भारताने आपल्या तेलाच्या स्रोतांमध्ये विविधता आणणे योग्य असल्याचे त्यांनी सांगितले. रशियाकडून होणाऱ्या तेल खरेदीबाबतही भारताच्या ऊर्जा गरजा लक्षात घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी मान्य केले. भारताच्या तेल शुद्धीकरण क्षमतेचेही त्यांनी कौतुक केले. भारताकडे जड कच्चे तेल शुद्ध करण्याची क्षमता आहे. बुधवारी गुजरातमधील जामनगर येथे रिलायन्स इंडस्ट्रीजच्या रिफायनरीला रुबियो भेट देणार आहेत. तेथे उद्योग क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींशीही ते चर्चा करणार आहेत. मुंबईत दाखल झाल्यानंतर रुबियो यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची गेटवे ऑफ इंडिया येथे भेट घेतली. मुख्यमंत्र्यांनी पारंपरिक पद्धतीने त्यांचे स्वागत केले. दोघांनी गेटवे ऑफ इंडिया परिसराची पाहणी केली. या भेटीत मुंबईच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाची माहिती रुबियो यांना देण्यात आली. रुबियो यांच्या भारत दौऱ्यात व्यापार करारासोबतच ऊर्जा सुरक्षा आणि भारत-अमेरिका धोरणात्मक संबंधाना विशेष महत्त्व दिले जात आहे.



तुरुंगातून चालणारे 'बिश्नोई' साम्राज्य, प्रशासन हतबल, पोलीस निष्फळ!

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल वर्धा

मुंबईत अभिनेता टायगर श्रॉफच्या गाडीवर झालेल्या गोळीबाराच्या घटनेने कायदा व सुव्यवस्था आणि प्रशासनाच्या दक्षतेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. सध्या गुजरातच्या साबरमती तुरुंगात असलेली लॉरेन्स बिश्नोईची टोळी, ११ राज्यांमध्ये आणि परदेशात आपले जाळे पसरवून पोलिसांसमोर एक अभूतपूर्व आव्हान उभे करत आहे.

लॉरेन्स बिश्नोई गँगने १८ ऑक्टोबर २०२६ रोजी बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफच्या कारवर जुहू, मुंबई येथे झालेल्या गोळीबाराची जबाबदारी स्वीकारली आहे. या गँगचा प्रमुख लॉरेन्स बिश्नोई गुजरातच्या साबरमती जेलमध्ये बंद असला, तरी विदेशातून चालणाऱ्या त्याच्या नेटवर्कमुळे मुंबईत पुन्हा एकदा घबराट पसरली आहे. या ताज्या हल्ल्यानंतर विरोधी पक्षांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर आणि सरकारच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

लॉरेन्स बिश्नोई टोळी सध्या भारतातील सर्वात मोठी आणि घातक गुन्हेगारी टोळी म्हणून समोर आली आहे. प्रशासकीय यंत्रणा आणि पोलीस यंत्रणेसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे या टोळीचा मुख्य सूत्रधार लॉरेन्स बिश्नोई देशातील अत्यंत सुरक्षित मानल्या जाणाऱ्या तुरुंगांमध्ये राहूनही आपले गुन्हेगारी साम्राज्य चालवत आहे. बिश्नोईची वाढती दहशत नियंत्रणात आणण्यात पोलीस आतापर्यंत अपयशी ठरले आहेत, सरकार आणि प्रशासन सुस्त आहे, या टोळीचा म्होरक्या तुरुंगात असूनही दहशत कायम आहे, टायगर हल्ल्याने पुन्हा एकदा सरकार आणि पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे.

रविवारी(१८/१०/२६) संध्याकाळी टायगर श्रॉफ एका फुटबॉल क्लबमधून बाहेर पडत असताना त्याच्या कारवर ५ राउंड गोळीबार करण्यात आला. टायगर श्रॉफ या हल्ल्यातून सुखरूप बचावला असला, तरी त्याचा ड्रायव्हर फिरदौस जखमी झाला असून त्याला नानावटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अमेरिकेतून कार्यरत असलेल्या बिश्नोई गँगच्या अनिल पंडित आणि हरमन संधू यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे या हल्ल्याची जबाबदारी घेतली.

सलमान खानसोबत काम न करण्याच्या गँगच्या इशाऱ्याकडे टायगरने दुर्लक्ष केल्यामुळे त्याला लक्ष्य करण्यात आल्याचे पोस्टमध्ये म्हटले आहे. गँगने थेट इशारा दिला आहे की, जो कोणी सलमान खानला मदत करेल किंवा त्याच्यासोबत काम करेल, त्याला सोडले जाणार नाही. या गँगने यापूर्वी सलमान खानच्या घराबाहेर गोळीबार, बाबा सिद्दीकी यांची हत्या आणि चित्रपट दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्या घराबाहेरही गोळीबार केला होता. मुख्य सूत्रधार तुरुंगात असतानाही गँगचे शूटर्स मोकळे फिरत असल्याने कायदा व सुव्यवस्थेवर टीका होत आहे. मात्र, पोलीस यंत्रणा सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे गँगच्या आंतरराष्ट्रीय नेटवर्कचा पर्दाफाश करण्यासाठी वेगाने तपास करत आहे.

लॉरेन्स बिश्नोई टोळीची वाढती दहशत, पोलीस आणि प्रशासनाचे अपयश, आणि जेलमध्ये असूनही गँगचा चालणारा कारभार या गंभीर मुद्द्यांवर सध्या सर्वत्र तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. मुंबईत नुकतीच झालेली माजी राज्यमंत्री बाबा सिद्दीकी यांची हत्या आणि बॉलिवूड अभिनेता सलमान खान याला वारंवार मिळणाऱ्या धमक्यांमुळे हा विषय अत्यंत संवेदनशील बनला आहे. सुरक्षेचे कडक दावे केले जात असतानाही, एक केंची जेलमधून एवढी मोठी गँग कशी चालवू शकतो, यावर सरकार आणि पोलीस प्रशासनावर विरोधकांकडून आणि जनतेकडून प्रचंड टीका होत आहे. पोलिसांचे गुप्तचर खाते आणि यंत्रणा या गँगचे मनसुबे मोडून काढण्यात अपयशी ठरत असल्याचा आरोप होत आहे.

बिश्नोई गँगने सलमान खानला (ज्याला पडद्यावर 'टायगर' म्हणून ओळखले जाते) काळवीट शिकार प्रकरणावरून लक्ष्य केले आहे. बिश्नोई समाजात काळवीट प्राण्याला पवित्र मानले जाते. या गँगने सलमान खानच्या घरावर गोळीबार करण्यापासून ते त्याच्या जवळच्या लोकांवर (उदा. बाबा सिद्दीकी) हल्ले करण्यापर्यंत मजल मारली आहे, ज्यामुळे मुंबईसह देशभरात दहशतीचे वातावरण आहे.

कडक सुरक्षा असलेल्या तिहार, बठिंडा आणि आता साबरमती तुरुंगात असूनही लॉरेन्स बिश्नोई अत्याधुनिक संवाद माध्यमांचा वापर करत असल्याचा आरोप आहे. तुरुंगातूनच त्याने थेट वृत्तवाहिन्यांना व्हिडिओ कॉलद्वारे मुलाखती दिल्या आहेत, ज्यामुळे कारागृह प्रशासनाच्या सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.पोलिसांना चकवा देण्यासाठी ही टोळी व्हीपीएन आणि एन्क्रिप्टेड मेसेजिंग ॲप्सचा (जसे की सिग्नल किंवा टेलिग्राम) वापर करते, ज्यामुळे त्यांचे लोकेशन ट्रॅक करणे कठीण होते.

लॉरेन्स बिश्नोई स्वतः तुरुंगात असला, तरी त्याचा भाऊ अनमोल बिश्नोई आणि गोल्डी ब्रार हे कॅनडा, अमेरिका आणि दुबईसारख्या देशांतून टोळीच्या कारवायांचे नियंत्रण करतात.

भारतात या टोळीकडे ७०० हून अधिक भाडोत्री शूटर असल्याचे सांगितले जाते. हे शूटर सोशल मीडिया किंवा स्थानिक संपर्कांद्वारे भरती केले जातात.

अभिनेता सलमान खानला धमक्या देण्यापासून ते महाराष्ट्रातील नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येपर्यंत, या टोळीने बड्या व्यक्तींना लक्ष्य केले आहे. व्यापारी, गायक आणि राजकारण्यांकडून कोट्यवधी रुपयांची खंडणी वसूल करून हे साम्राज्य आर्थिकदृष्ट्या मजबूत झाले आहे. बिश्नोई टोळी पंजाब, हरियाणा, राजस्थान, दिल्ली आणि महाराष्ट्रात सक्रिय आहे. वेगवेगळ्या राज्यांच्या पोलिसांमध्ये तात्काळ समन्वयाचा अभाव असल्यामुळे या टोळीला मोकळे रान मिळते. कडक कायदे असूनही मोक्का किंवा यूएपीए अंतर्गत ठोस पुरावे गोळा करून त्यांना न्यायालयात सिद्ध करेपर्यंत टोळी नवीन गुन्हे करत राहते.

एनआयएने बिश्नोई टोळीविरुद्ध कठोर गुन्हे दाखल केले असून त्याच्या अनेक साथीदारांना अटक केली आहे. अमेरिकेच्या FBI ने बिश्नोई गँगचा कॅनडा/अमेरिका येथील म्होरक्या गोल्डी ब्रार याच्यावर $१ मिलियनचे बक्षीस ठेवून त्याला त्यांच्या 'Top 10 Most Wanted' यादीत समाविष्ट केले आहे. तसेच कॅनडा सरकारने या टोळीला संघटित गुन्हेगारी आणि हिंसक कारवायांमध्ये गुंतलेली संघटना म्हणून घोषित केले आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सरकारकडून कडक पावले उचलली जात असल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात जमिनीवर या गँगची दहशत कमी झालेली दिसत नाही. यामुळेच "सरकार आणि पोलीस प्रशासन नक्की काय करत आहे?" असा सवाल उपस्थित केला जात आहे.

तुरुंगातील अंतर्गत सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करणे आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर रोखणे हे सध्याच्या घडीला पोलीस आणि प्रशासनासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे.

- ९५६१५९४३०६

भारतीय खेळाडूंची आयसीसी क्रमवारीत पिछेहाट?

फलंदाजांचे वर्चस्व कायम; गोलंदाजी आणि अष्टपैलूंच्या विभागात मात्र भारतीयांचे आव्हान मर्यादित!

डॉ. दत्ता विघावे, क्रिकेट समीक्षक

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारतीय संघाची ताकद, फलंदाजांची समृद्ध परंपरा आणि जागतिक क्रिकेटवरील प्रभाव यांची नेहमीच चर्चा होते. मात्र, आयसीसीच्या पुरुष एकदिवसीय क्रमवारीतील चित्र पाहिले, तर भारतीय क्रिकेटच्या सामर्थ्याबरोबरच काही अस्वस्थ करणारे प्रश्नही समोर येतात. फलंदाजीच्या क्रमवारीत भारतीय खेळाडूंचे वर्चस्व असले, तरी गोलंदाजी आणि अष्टपैलूंच्या विभागात हेच वर्चस्व दिसत नाही. मग भारतीय क्रिकेटची ताकद ही विशिष्ट विभागापुरती मर्यादित होत आहे का?

फलंदाजीच्या क्रमवारीत शुभमन गिल ८४१ गुणांसह अव्वल स्थानी आहे. विराट कोहली तिसऱ्या, तर रोहित शर्मा चौथ्या क्रमांकावर आहे. पहिल्या दहामध्ये के. एल. राहुलनेही स्थान मिळवले आहे. ही भारतीय क्रिकेटसाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे. मात्र, या यशाकडे केवळ क्रमांकांच्या चष्म्यातून पाहणे पुरेसे ठरणार नाही. जागतिक क्रमवारीत आघाडीवर असणे आणि प्रत्यक्ष मैदानावर सातत्याने निर्णायक कामगिरी करणे, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

गिलचे अव्वल स्थान भारतीय फलंदाजीतील नव्या पिढीची क्षमता अधोरेखित करते. विराट कोहलीचा अनुभव आणि रोहित शर्माची आक्रमकता यामुळे भारताची फलंदाजी कागदावर भक्कम दिसते. परंतु, या दिग्गजांच्या कामगिरीवर अवलंबून राहण्याऐवजी त्यांच्यानंतरची फळी किती प्रभावी ठरते, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. क्रमवारीतील स्थान टिकवण्यासाठी धावा पुरेशा असल्या, तरी मोठ्या स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवण्यासाठी दबावाखाली धावा करण्याची क्षमता आवश्यक असते.

गोलंदाजीत भारतीयांचे स्थान कुठे?

फलंदाजीच्या तुलनेत गोलंदाजीच्या क्रमवारीत भारताची स्थिती फारशी समाधानकारक दिसत नाही. अफगाणिस्तानचा राशिद खान अव्वल स्थानी असून पाकिस्तान, दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडच्या गोलंदाजांनीही आघाडीच्या स्थानांवर आपली पकड मजबूत केली आहे. भारताचा कुलदीप यादव पाचव्या क्रमांकावर हा देशातील सर्वोच्च क्रमांकाचा गोलंदाज आहे. कुलदीपचे स्थान निश्चितच महत्त्वाचे आहे; परंतु पहिल्या दहामध्ये केवळ एका भारतीय गोलंदाजाचे अस्तित्व हा चिंतनाचा विषय आहे. विशेष म्हणजे याच कुलदीपला भारताच्या अंतिम अकरा जणांच्या संघात सातत्याने संधीही मिळत नाही. भारतासारख्या क्रिकेटच्या महासत्तेकडे वेगवान आणि फिरकी गोलंदाजांची मोठी फळी असताना जागतिक क्रमवारीत अधिक भारतीय गोलंदाज का दिसत नाहीत, याचा विचार करायला हवा.

याचा अर्थ भारतीय गोलंदाज प्रभावहीन आहेत, असा मात्र मुळीच नाही. गोलंदाजांची क्रमवारी वैयक्तिक कामगिरी, खेळलेल्या सामन्यांची संख्या आणि प्रतिस्पर्ध्यांची गुणवत्ता अशा अनेक घटकांवर अवलंबून असते. तरीही, जागतिक स्तरावर सातत्यपूर्ण प्रभाव पाडणाऱ्या गोलंदाजांची संख्या वाढवणे ही भारतीय क्रिकेटसमोरील गरज आहे.

केवळ एक-दोन प्रमुख गोलंदाजांवर अवलंबून राहण्यापेक्षा संपूर्ण गोलंदाजी विभाग सक्षम असणे अधिक महत्त्वाचे आहे.

अष्टपैलूंच्या यादीतही अपेक्षाभंग

अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत अफगाणिस्तानचा अजमतुल्लाह उमरझई अव्वल स्थानी आहे. झिम्बाब्वेचा सिकंदर रझा दुसऱ्या, तर बांगलादेशचा मेहदी हसन मिराज तिसऱ्या क्रमांकावर आहे. भारताचा अक्षर पटेल नवव्या स्थानावर असून पहिल्या दहामधील तो एकमेव भारतीय अष्टपैलू आहे.

ही बाब विशेष लक्षवेधी आहे. आधुनिक एकदिवसीय क्रिकेटमध्ये केवळ धावा करणारे फलंदाज किंवा केवळ बळी मिळवणारे गोलंदाज पुरेसे ठरत नाहीत. फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही आघाड्यांवर योगदान देणारे खेळाडू संघाचा समतोल राखतात. गरजेनुसार फलंदाजीचा क्रम बदलण्याची, अतिरिक्त गोलंदाजीचा पर्याय उपलब्ध करून देण्याची आणि कठीण परिस्थितीत सामना फिरवण्याची क्षमता अष्टपैलू खेळाडूंमध्ये असते.

अशा वेळी जागतिक क्रमवारीत भारताचे प्रतिनिधित्व एका खेळाडूपुरते मर्यादित असणे ही बाब निवडकर्त्यांसाठी विचार करण्यासारखी आहे. भारताकडे अष्टपैलू खेळाडूंची कमतरता आहे, असे सरसकट म्हणता येणार नाही; मात्र त्यांच्याकडून आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्यपूर्ण आणि दुहेरी योगदान मिळते आहे का, हा खरा प्रश्न आहे.

क्रमवारी म्हणजे अंतिम निकाल नव्हे!

या क्रमवारीवरून भारतीय क्रिकेटची घसरण सुरू झाली, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. फलंदाजीमध्ये भारताचे वर्चस्व कायम आहे आणि कुलदीप यादव व अक्षर पटेल यांच्यासारखे खेळाडू अनुक्रमे गोलंदाजी व अष्टपैलू विभागांत भारताचे प्रतिनिधित्व करत आहेत. त्यामुळे परिस्थिती निराशाजनक नसली, तरी आत्मसंतुष्ट राहण्यासारखीही नाही. आयसीसी क्रमवारी ही खेळाडूंच्या वैयक्तिक कामगिरीचा महत्त्वाचा निदेशक आहे; परंतु ती संघाच्या एकूण सामर्थ्याची संपूर्ण कहाणी सांगत नाही. क्रमवारीतील स्थान, प्रत्यक्ष सामन्यांतील योगदान आणि मोठ्या स्पर्धांमधील कामगिरी या तिन्हींचा एकत्रित विचार केला पाहिजे.

भारतीय क्रिकेटमध्ये फलंदाज घडवण्याची परंपरा मजबूत आहे. आता त्याच ताकदीने दर्जेदार गोलंदाज आणि प्रभावी अष्टपैलू घडवण्यावरही भर देण्याची गरज आहे. खेळाडूंची निवड करताना केवळ नाव, प्रतिष्ठा किंवा संभाव्य गुणवत्ता नव्हे, तर सातत्य, तंदुरुस्ती, परिस्थितीनुसार कामगिरी आणि संघाच्या गरजांशी जुळणारे कौशल्य यांना प्राधान्य मिळायला हवे. भारतीय फलंदाजांनी जागतिक क्रमवारीत झेंडा रोवला आहे; पण क्रिकेटचा खरा झेंडा तेव्हाच उंचावेल, जेव्हा गोलंदाजी आणि अष्टपैलूंच्या विभागातही भारताचे अनेक खेळाडू आघाडीच्या स्थानांवर दिसतील.

शेवटी प्रश्न भारतीय क्रिकेटकडे प्रतिभा आहे की नाही, हा नाही; तर त्या प्रतिभेचे सर्व विभागांत जागतिक दर्जाच्या कामगिरीत रूपांतर किती प्रभावीपणे होते आहे, हा आहे. क्रमवारीतील ही असमानता धोक्याची घंटा मानण्यापेक्षा सुधारणा करण्याची संधी म्हणून स्वीकारली, तरच भारताचे एकदिवसीय क्रिकेट अधिक संतुलित आणि सामर्थ्यवान बनेल.

- ९०९६३७२०८२

आझाद हिंद सेना : भारतीय स्वातंत्र्यामागील शक्ती

कृष्णकुमार निकोडे गडचिरोली

आझाद हिंद सेनेचे संस्थापक नेताजी सुभाषचंद्र बोस हे एक क्रांतिकारक विचारवंत होते. भारताच्या स्वातंत्र्याच्या अंतिम लढ्यात ब्रिटिशांना धडा शिकवण्याचे कार्य नियतीने त्यांच्यावर सोपवले होते. नेताजींचे हे पवित्र कार्य "आझाद हिंद सेने"च्या हिंदस्तानी सैनिकांनी दाखवलेल्या अथांग शौर्याने आणि देह, मन व संपत्तीच्या अतुलनीय त्यागाने पूर्ण केले.

नजरकैदेतून सुटल्यानंतर सुभाषबाबू फेब्रुवारी १९४३ पर्यंत जर्मनीमध्ये राहिले. त्यांनी जर्मन हुकूमशहा हिटलरला अनेकदा भेट दिली आणि भारताला स्वतंत्र करण्यासाठी मदतीचे आवाहन केले. दुसऱ्या महायुद्धात विजयाच्या घोडदौडीत असलेल्या हिटलरने सुभाषचंद्र बोसांना सहकार्य देऊ केले. त्यांनी जर्मनीला शरण गेलेल्या ब्रिटिश सैन्यातील हिंदुस्तानी सैनिकांना प्रबोधन केले. हिंदुस्तानी सैनिक सुभाषचंद्र बोसांच्या व्याख्यानांनी प्रभावित होत आणि स्वातंत्र्याची शपथ घेत असत.

जर्मनीचा मित्रराष्ट्र असलेल्या जपानचे सैन्य पूर्व आशियाई देशांमध्ये ब्रिटिश सैन्याचा पराभव करत होते. शरण आलेल्या ब्रिटिश सैन्यात हिंदुस्तानी सैनिकही होते. तिथे आधीपासूनच वास्तव्यास असलेल्या राशबिहारी बोस यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या मार्गदर्शनानुसार या हिंदुस्तानी सैनिकांना संघटित करण्यास सुरुवात केली.

या सैनिकांना भेटण्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी एका जर्मन पाणबुडीतून ९० दिवसांचा प्रवास केला, सर्व अडचणींवर मात केली आणि जुलै १९४३ मध्ये जपानची राजधानी टोकियो येथे पोहोचले. राशबिहारी बोस यांनी या सैन्याचे नेतृत्व नेताजींकडे सोपवले आणि दि. ५ जुलै १९४३ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी सिंगापूरमध्ये आझाद हिंद सेनेची स्थापना केली. आपल्या ऐतिहासिक भाषणात हजारो सैनिकांना संबोधित करताना ते म्हणाले, मित्रांनो, सैनिकांनो, तुमची युद्धगर्जना एकच असू द्या! 'दिल्ली चलो!' दिल्लीपर्यंत आपल्यापैकी किती जण वैयक्तिकरित्या जिवंत राहतील हे मला माहीत नाही; पण मला खात्री आहे, विजय आपलाच आहे. म्हणून उभे राहा आणि शस्त्रे उचला. भारतात क्रांतिकारकांनी तुमच्यासाठी आधीच एक मार्ग तयार केला आहे आणि हा मार्ग आपल्याला दिल्लीपर्यंत घेऊन जाईल. दिल्ली चलो!

हजारो हिंदुस्तानी सैनिकांची फौज तयार करून आणि भारताच्या स्वातंत्र्यासाठी पूर्व आशियातील लाखो हिंदुस्तानी लोकांचा पाठिंबा मिळवल्यानंतर नेताजींनी दि. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी स्वतंत्र भारताचे आणखी एक अंतरिम सरकार स्थापन केले. या सरकारला जपान, जर्मनी, चीन, इटली, बर्मा यांनी मान्यता दिली होती. आझाद हिंद सेना ही या सरकारची सेना होती. आझाद हिंद सेना ही सर्व जाती, विविध राज्ये आणि वेगवेगळ्या भाषांतील सैनिकांची सेना होती. सेना एक एकात्मिक एकक होती. "कदम कदम बढाये जा" हे प्रेरणादायी गीत ओठांवर घेऊन, नेताजी आणि त्यांच्या सैन्याने स्वतंत्र भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी एका विजयी मोहिमेला सुरुवात केली.

नेताजींनी राणी झाशीच्या सैन्याच्या धर्तीवर "राणी ऑफ झाशी रेजिमेंट"ची स्थापना केली. पुरुषांसोबत महिलांनीही लष्करी प्रशिक्षणात सहभागी व्हावे, अशी त्यांची ठाम भूमिका होती. नेताजी म्हणायचे, सन १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात लढाया लढलेल्या राणी झांशी या महिलांसाठी आदर्श असायला हव्यात, जेणेकरून त्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होऊन भारताला स्वतंत्र करण्याच्या पवित्र कार्यात योगदान देऊ शकतील".

आझाद हिंद सेनेने स्थापन केलेल्या सरकारचे सदस्य हेच आझाद हिंद सेनेने स्थापन केलेल्या सरकारचे सदस्य बनले. आझाद हिंद सेनेने ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध बंड करताच, जपानचे राष्ट्राध्यक्ष जनरल तोजो यांनी इंग्लंडकडून जिंकलेली अंदमान आणि निकोबार ही दोन बेटे आझाद हिंद सेनेच्या स्वाधीन केली. दि. २९ डिसेंबर १९४३ रोजी स्वतंत्र भारताचे राष्ट्रप्रमुख म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी अंदमानला भेट दिली, ध्वजारोहण केले आणि सेल्युलर जेलमध्ये शिक्षा भोगत असलेल्या क्रांतिकारकांना आदरांजली वाहिली.

नेताजींनी जानेवारी १९४४ मध्ये आपले सैन्य बर्मामध्ये दाखल केले. दिनांक १९ मार्च १९४४ रोजी आझाद हिंद सेनेने भारताच्या भूमीत प्रवेश केला आणि इतिहास घडला.

या सैन्याने इम्फाळ, कोहिमा यांसारख्या ठिकाणी ब्रिटिश सैन्याचा पराभव केला. या विजयी प्रसंगी आपल्या भाषणात नेताजी गर्जना करत म्हणाले, "आपली मातृभूमी स्वातंत्र्याच्या शोधात आहे! आज, मी तुमच्याकडे सर्वांत आधी एक गोष्ट मागतो. मी तुमच्या रक्ताची मागणी करतो. मला रक्त द्या आणि मी तुम्हाला स्वातंत्र्याचे वचन देतो!" हे भाषण इतिहासात अजरामर झाले. त्यांच्या भावपूर्ण शब्दांनी तेथे उपस्थित असलेल्या तरुण हिंदुस्तानी तरुणांना रोमांचित केले आणि त्यांनी आपली शपथ रक्ताने लिहिली.

- ९४२३७१४८८३

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

कराळे मास्तरांची शरद पवारांच्या राष्ट्रवादीतून ६ वर्षांसाठी हकालपट्टी

पक्ष शिस्तीचं उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई

दै. सिंहवाणी वृत्त, वर्धा

नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते निलेश कराळे मास्तर यांनी बंडखोर केली आहे. यानंतर पक्षाने मोठा निर्णय घेतला आहे. कराळे मास्तर यांची ६ वर्षांसाठी पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अभिजीत वंजारी यांना पाठिंबा दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने याबाबत अधिकृत पत्राक जारी केले आहे.

पक्ष शिस्तीचे उल्लंघन केल्याप्रकरणी निलेश कराळे गुरुजी यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. नागपूर पदवीधर निवडणुकीत पक्षाच्या निर्णयाचा विरोधात जाऊन अपक्ष उमेदवारी अर्ज भरणे आणि



निलंबनानंतर निलेश कराळे यांना अश्रू अनावर

आपल्याला शरद पवारांचा आशीर्वाद निवडणुकीत असल्याचा संभ्रम निर्माण केल्याप्रकरणी कारवाई करण्यात आली आहे. पक्षाचे सरचिटणीस रविंद्र पवार यांच्या सहीचे कारवाई करणारे पत्र एबीपी माझाच्या हाती लागले आहे. निलेश कराळे गुरुजी सोशल मीडियात वादग्रस्त वक्तव्य आणि आपल्या शिकवण्याच्या वेगळ्या पद्धतीमुळे प्रसिद्ध आहेत. गेल्या काही दिवसांपासून कराळे यांनी आघाडीविरोधात प्रचार केला होता. आता मतदानाच्या अवघ्या काही तासापूर्वी झालेल्या या कारवाईचा निवडणुकीवर काय परिणाम होणार, याकडे लक्ष लागलंय.

निवडणुकीत शरद पवारांचा आशीर्वाद आशिर्वाद असल्याचे सांगणे ही आपली कृती पक्षाची शिस्त, धोरणे आणि महाविकास आघाडीच्या निर्णयांचे स्पष्ट उल्लंघन करणारी आहे. यामुळे, पक्षशिस्तीचे उल्लंघन केल्याबद्दल पक्षाचे प्रदेशाध्यक्ष / वरिष्ठ नेतृत्वाच्या निर्देशानुसार आपणास पक्षातून ६ वर्षांकरिता निष्कासित करण्यात येत आहे, याची आपण नोंद घ्यावी असं पत्रात म्हटलं आहे.

नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदानाच्या काही तास आधी महत्त्वाची घडामोड घडली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बंडखोर उमेदवार निलेश कराळे यांची सहा वर्षांसाठी पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. एवढेच नाही तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अभिजीत वंजारी यांना पूर्ण पाठिंबा ही जाहीर केला आहे.

थोडक्यात

सामाजिक समस्यांच्या रावणाचे दहन करून यंग स्टार मंडळाचा जनजागृतीचा संदेश

महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, वोट चोरीविरोधात अनोखा उपक्रम



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

यंग स्टार क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, मारोती नगर, वाडी यांच्या वतीने आयोजित रावण दहन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, वोट चोरी, प्रदूषण आणि जातिवाद यांसारख्या सामाजिक समस्यांचे प्रतीकात्मक रावण दहन करून जनजागृतीचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पुरुषोत्तम रागीट उपस्थित होते. मंडळाचे अध्यक्ष तथा नगरसेवक राजेश थोराणे यांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. रावणाच्या प्रतिकृतीवर विविध सामाजिक समस्यांची नावे लिहून नागरिकांचे लक्ष या प्रश्नांकडे वेधण्यात आले. केवळ रावणाचे दहन न करता समाजातील अनिष्ट प्रवृत्तींचा नाश करून स्वच्छ, सुजाण आणि समताधिष्ठित समाज निर्माण करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी महागाईचा रावण जाळा, सामान्य जनतेला दिलासा मिळवून द्या, बेरोजगारीचा रावण जाळा, युवकांना रोजगार मिळवून द्या, भ्रष्टाचाराचा रावण जाळा, प्रामाणिक प्रशासन घडवा, अशा घोषणांतून सामाजिक प्रश्नांवर जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमाला नितीन थोराणे, बालकृष्ण लिचडे, योगेश सावरबांधे, किशोर गिरपुंजे, संजय कावळकर, अतुल देरकर, शुभम नेवलकर, अनुप थोराणे, मयूर डवरे, पुष्कर मुळे, मोहित शेंडे, अंशुल बघेल, चंद्रभान लिचडे, सचिन तिजारे, मनोज वंजारी, स्मित थोराणे, आदर्श मिश्रा, दीप गोरे, येकाशा राऊत, लक्ष वाघडे, नयन गिरपुंजे, अमन गिरपुंजे, रोशन साखरकर आणि प्रथमेश गिरपुंजे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सामाजिक समस्यांविरुद्ध जागरूक राहून सकारात्मक बदलासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले.

वाडीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अनुयायांचे अभिवादन



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त वाडीत ठिकठिकाणी अनुयायांनी माल्यार्पण करून अभिवादन केले. वाडी अमरावती महामार्ग स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा प्रांगणात वाडी विकास संघर्ष आघाडीच्या वतीने तथागत बुद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सम्राट अशोक यांच्या पुतळ्यांना अगरबत्ती, मेणबत्ती प्रज्वलित केली व माल्यार्पण करून अभिवादन केले. तदनंतर सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली. कार्यक्रमाला आघाडीचे अध्यक्ष प्रकाश कोकाटे, कार्याध्यक्ष मधु माणके पाटील सह भिमराव लोखंडे, अमित हुसनापुरे, चंद्रशेखर येवले, दीपक ठाकरे, जेम्स फ्रान्सिस, अशोक गडलिंगे, संदीप रायजादे इं उपस्थित होते.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त प.पू. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात डॉ बाबासाहेब आंबेडकर, तथागत गौतम बुद्ध यांना माल्यार्पण व अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष अश्विन बैस, पंकज फलके, आशीष पाटील, संजय जीवनकर, किशोर नागपुरकर, नीता मडावी, रीना चिमणकर, गणेश बावणे, भीमराव कांबळे, मनोज भागवतकर, ईशांत जंगले, विनोद बारगे, अमोल केदार, सुदर्शन ठिस्के, सौरव नाईक, अनुप रामटेके, देवा दिवे, शुभम पिंपळे इत्यादी उपस्थित होते. यावेळी स्मारक परिसरात जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी दिनेश बनसोड, राजेश जंगले, प्रकाश गजभिये, इत्यादींनी माल्यार्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते दिनेश कोचे, गौतम तिरपुडे, अनिल पुंड, दिलीप भोरगडे, बाबुराव वासनिक, नितीन वाघमोडे, प्रवीण तायडे, जितेंद्र पानतावने, भोजराज नंदागवळी, प्रेम ठवरे, ईश्वर उके, चंदू सोनपिंपळे, अनिल वानखडे, देवा राऊत इत्यादी उपस्थित होते.

हजरत बाबा सैय्यद जमालुद्दीन यांचा ८८ वा सालाना उर्स २४ व २५ ऑक्टोबरला

शनिवारी दरगाह शरीफवर चादर चढविण्याचा कार्यक्रम, रविवारी गुलामे फरीद यांची शानदार कव्वाली

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

हजरत बाबा सैय्यद जमालुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांच्या ८८ व्या सालाना उर्स मुबारकचे आयोजन शनिवार, २४ आणि रविवार, २५ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. हा उर्स पोलिस लाईनटाकळी परिसरात, एम.टी.वर्कशॉपच्या मागे, काटोल रोड, नागपूर येथे होणार आहे. शनिवारी, २४ ऑक्टोबर रोजी रात्री ७.३० वाजता. मान्यवरांच्या हस्ते दरगाह शरीफवर चादर चढविण्याचा धार्मिक कार्यक्रम पार पडेल. या कार्यक्रमाला पश्चिम नागपूरचे आमदार विकास पांडुरंग ठाकरे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच विवेक रमेश निकोसे, कमलेश चौधरी, प्रमोद ठाकूर, अरुण डवरे, स्नेहा निकोसे, रश्मी धुर्वे, अमील भाई, सहारे साहेब, वाहने साहेब आणि राजेश कांबळे यांच्यासह अन्य मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सैय्यद अबरार अली आणि सैय्यद इशरार अली भूषविणार आहेत.

उर्सच्या दुसऱ्या दिवशी, रविवार, २५ ऑक्टोबर रोजी रात्री ७.३० वाजता. शानदार कव्वाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध कव्वाल गुलामे फरीद आपल्या कव्वालीच्या माध्यमातून उपस्थितांना सुफी संगीताची मेजवानी देणार आहेत.

आसमान फाऊंडेशनतर्फे कन्यापूजनासह विद्यार्थ्यांना शैक्षणिक व क्रीडा साहित्याचे वाटप

गावागावांतून खेळाडू निर्माण व्हावेत, हेच उद्दिष्ट : डॉ. रवि गिऱ्हे यांचे प्रतिपादन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून आसमान फाऊंडेशन, नागपूर यांच्या वतीने बोथली ठाणा येथील माध्यमिक शाळेत कन्यापूजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले, तसेच शाळेला क्रीडा साहित्य भेट देण्यात आले. धार्मिक परंपरेचे जतन करण्यासोबतच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि क्रीडा विकासाला प्रोत्साहन देण्याचा स्तुत्य उपक्रम फाऊंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात आला. नवरात्रात कन्या पूजनाला विशेष महत्त्व आहे. याच परंपरेचे पालन करत आसमान फाऊंडेशनच्या वतीने कन्यापूजनाचे आयोजन करण्यात आले. फाऊंडेशनच्या डॉ. साधना थोते, मेघा गिऱ्हे तसेच शाळेतील महिला शिक्षिकांनी कन्यापूजनाचे विधी पूर्ण केले. या उपक्रमातून मुलींचा सन्मान, स्त्रीशक्तीचा गौरव आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. याप्रसंगी फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. रवि गिऱ्हे यांच्या हस्ते गरजू विद्यार्थ्यांना स्टेशनरी साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे आणि आर्थिक अडचणींमुळे त्यांचा शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यासोबतच शाळेतील विद्यार्थ्यांना खेळाच्या माध्यमातून आपले कौशल्य विकसित करता यावे, यासाठी शाळेला स्पोर्ट्स अर्थात क्रीडा साहित्य भेट देण्यात आले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही क्रीडा क्षेत्रात मोठी क्षमता असते. मात्र, अनेकदा आवश्यक साहित्य आणि योग्य संधींच्या अभावामुळे त्यांना आपल्या कौशल्याला वाव देता येत नाही. विद्यार्थ्यांना योग्य सुविधा आणि प्रोत्साहन मिळाल्यास ग्रामीण भागातूनही उत्कृष्ट खेळाडू घडू शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रालाही प्राधान्य देणे गरजेचे आहे. गावागावांतून उत्तम खेळाडू निर्माण व्हावेत, या उद्देशाने आसमान फाऊंडेशनच्यावतीने विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्य उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे प्रतिपादन गिऱ्हे यांनी केले. शिक्षण, क्रीडा आणि सामाजिक जाणीव यांचा संगम साधणारे असे उपक्रम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वाचे ठरतात. गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याबरोबरच त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे आणि त्यांना विविध क्षेत्रांत पुढे जाण्यासाठी प्रोत्साहित करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे. याप्रसंगी नरेश शेंडे, दिनेश टेकाडे, शाळेचे मुख्याध्यापक सुनील टेकाडे तसेच शिक्षकवर्ग उपस्थित होता.

दर्शन कॉलनीत रावण दहन व नेत्रदीपक फटाका शो

भक्तिगीतांच्या सुरांनी दसरा महोत्सवात रंगत, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विजया दशमीनिमित्त दर्शन कॉलनी येथील शीतला माता मंदिर मैदानावर रावण दहन, नेत्रदीपक फटाका शो आणि भक्तिगीतांच्या ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले. रंगीबेरंगी आतषबाजी आणि संगीताच्या कार्यक्रमाने परिसरातील नागरिकांना मंत्रमुग्ध केले. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी या महोत्सवाचा आनंद घेतला.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) नागपूर शहर व जिल्ह्याच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रदेश उपाध्यक्ष चंद्रपाल चौकसे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्रदेश महासचिव प्रशांत पवार होते. विरोधी पक्षनेते तथा प्रदेश महासचिव तानाजी वनवे आणि मालुताई वनवे, शहराध्यक्ष अनिल अहिरकर, नगरसेविका आभाताई पांडे यांच्यासह विविध पदाधिकारी, नगरसेवक आणि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात रावण दहनानंतर आकर्षक फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. विशाल खांडेकर, विजय मधुमटके यांच्या म्युझिकल ऑर्केस्ट्राने कार्यक्रमात रंगत आणली. विजय वनवे हे मुख्य आयोजक होते, तर बालाजी डिकोंडवार आयोजन समितीचे अध्यक्ष होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. नंदनवन पोलीस स्टेशनच्या पोलीस विभागाचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे संचालन राजेश अंबुलकर यांनी केले. वाईटावर चांगल्याचा आणि असत्यावर सत्याचा विजय हा विजया दशमीचा संदेश देणारा हा सोहळा उत्साहात पार पडला. दर्शन कॉलनीसह पूर्व व मध्य नागपुरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दसरा महोत्सवाचा आनंद घेतला.

भिवापूर महाविद्यालयाच्या महिला कबड्डी संघाला गट 'क'चे विजेतेपद

अंतिम सामन्यात बिंझाणी महाविद्यालयावर ४९-४५ गुणांनी मात

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन महिला गट 'क' कबड्डी स्पर्धेत भिवापूर महाविद्यालयाने विजेतेपद पटकावले. नागपूर येथील सी. पी. अँड बेरार महाविद्यालयाच्या वतीने २१ व २२ ऑक्टोबरदरम्यान या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



भिवापूर महाविद्यालयाच्या संघाने उपांत्य सामन्यात विमेन्स महाविद्यालय, नागपूरचा ४०-१० गुणांनी पराभव करीत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात श्री बिंझाणी सिटी महाविद्यालय, नागपूरच्या संघाला ४९-४५ गुणांनी नमवत भिवापूरच्या महिला खेळाडूंनी विजेतेपदावर नाव कोरले. या विजयात डिंपल पंचभाई, अदिती सेलोकर, खुशबू मालोदे आणि श्वेता गायकवाड यांनी उत्कृष्ट कामगिरी करीत मोलाचे योगदान दिले.

बँकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटी, नागपूरच्या अध्यक्षा सुमनमाला मुळक, सचिव राजेंद्र मुळक, कोषाध्यक्ष यशराज मुळक तसेच भिवापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले. आगामी स्पर्धांसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

रोटावेटरच्या विळख्यात शेतमजुराचा दुर्दैवी अंत, मुलाचा घातपाताचा आरोप!

सायवाडा शिवारातील थरारक घटना, मृतदेहाची अवस्था पाहून घटनास्थळी हळहळ, ट्रॅक्टर चालकाला अटक, शेतमालकाच्या भूमिकेचीही चौकशी करण्याची मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

नरखेड तालुक्यातील सायवाडा शिवारात शेतात काम करत असताना रोटावेटरमध्ये अडकल्याने ६० वर्षीय शेतमजुराचा अत्यंत दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (२० ऑक्टोबर) सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास घडली. बाबाराव काळे (वय ६०, रा. थडीपवनी) असे मृत शेतमजुराचे नाव आहे. या घटनेने सायवाडा आणि थडीपवनी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, मृत शेतमजुराचा मुलगा रोशन काळे याने हा अपघात नसून आपल्या वडिलांचा घातपात झाल्याचा गंभीर आरोप केल्याने या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे.



पोलिसांनी ट्रॅक्टर चालक प्रवीण हरिहर गायनेर (वय ३१, रा. थडीपवनी) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ च्या कलम १०५ अन्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक केली असून, घटनास्थळावरील ट्रॅक्टरही जप्त करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, बाबाराव काळे हे सायवाडा शिवारातील सेवानिवृत्त पटवारी कृष्णराव हरले यांच्या शेतात मजुरीच्या कामासाठी गेले होते. शेतात रोटावेटरद्वारे मशागतीचे काम करण्यासाठी ट्रॅक्टर भाड्याने बोलावण्यात आला होता. मंगळवारी दुपारपासून शेतात रोटावेटरचे काम सुरू होते. शेतीची मशागत सुरू असताना ठिबक सिंचनाच्या नळ्या ट्रॅक्टरमध्ये अडकू नयेत, यासाठी काळे या नळ्या बाजूला करण्याचे काम करीत होते.

सायंकाळी सुमारे ४ वाजताच्या सुमारास ठिबक सिंचनाची एक नळी ट्रॅक्टरच्या रोटावेटरमध्ये अडकली. ही नळी काढण्याच्या प्रयत्नात बाबाराव काळे रोटावेटरमध्ये अडकल्याचे ट्रॅक्टर चालकाने सांगितले. रोटावेटरच्या फिरत्या यंत्रामध्ये अडकल्याने त्यांच्या शरीराची अत्यंत गंभीर अवस्था झाली. या भीषण घटनेत त्यांचा जागीच मृत्यू झाल्याचे समोर आले. शेतात सुरू असलेले काम क्षणार्धात मृत्यूच्या घटनेत बदलल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.या घटनेची माहिती मिळताच नरखेड पोलिस ठाण्याचे ठाणेदार विनोद जांभळे हे पोलिस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला. मृतदेहाची अवस्था पाहता तो शवविच्छेदनासाठी रुग्णालयात नेणे शक्य नसल्याने मेंढला येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलावण्यात आले. त्यानंतर शेतातच शवविच्छेदनाची प्रक्रिया पार पाडण्यात आली. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली होती.

पोलिसांनी या प्रकरणात ट्रॅक्टर चालक प्रवीण हरिहर गायनेर याला ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०५ अन्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. तसेच घटनास्थळावरील ट्रॅक्टर जप्त करण्यात आला आहे. या घटनेमागील नेमकी परिस्थिती, काम सुरू असताना घेतलेली खबरदारी आणि घटनेची जबाबदारी यांचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. मृत्यूच्या घटनेनंतर मुलाने थेट घातपाताचा आरोप केल्याने या प्रकरणातील संशय अधिक गडद झाला आहे. मात्र, रोशन काळे याने केलेले आरोप अद्याप सिद्ध झालेले नसून, तपासातूनच त्यातील सत्य स्पष्ट होणार आहे. त्यामुळे पोलिसांनी केवळ अपघाताची शक्यता न तपासता मृताच्या मुलाने उपस्थित केलेल्या संशयाचीही सखोल चौकशी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

शेतमजुराच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

शेतीच्या कामासाठी ट्रॅक्टर आणि रोटावेटरसारख्या यंत्रांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. मात्र, ही यंत्रे सुरू असताना त्यांच्या जवळ काम करणाऱ्या मजुरांच्या सुरक्षिततेकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असते. ठिबक सिंचनाच्या नळ्या बाजूला करताना घडलेल्या या घटनेमुळे शेतीतील यांत्रिक कामांदरम्यान मजुरांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. यंत्रसामग्री सुरू असताना आवश्यक खबरदारी घेतली होती का, घटनेच्या वेळी नेमकी परिस्थिती काय होती आणि या मृत्यूला कोण जबाबदार आहे, याचा तपासातून उलगडा होणे महत्त्वाचे ठरणार आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार विनोद जांभळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक आकाश महाकाळ आणि बीट जमादार मोरेश्वर चलपे करीत आहेत. बाबाराव काळे यांच्या मृत्यूमागील नेमके कारण आणि त्यांच्या मुलाने केलेल्या घातपाताच्या आरोपातील सत्य तपासानंतरच समोर येणार आहे.

थोडक्यात

ज्योतिरामजी लोखंडे बहुउद्देशीय संस्थेचा ३९-४० वर्षांपासून सेवाभावी उपक्रम



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भारतीय बौद्धांच्या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी ७० व्या धम्मचक्र प्रवर्तनदिनानिमित्त नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर देश-विदेशातून येणाऱ्या धम्मबांधव- भगिनींच्या सेवेसाठी ज्योतिरामजी लोखंडे बहुउद्देशीय संस्था, नागपूर यांच्या वतीने भव्य सस्नेह भोजनदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या धम्मबांधव- भगिनींच्या सेवेसाठी भोजनदान, पिण्याचे पाणी आणि इतर सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या संस्था महत्त्वपूर्ण योगदान देत असतात.

याच सेवाभावी भावनेतून ज्योतिरामजी लोखंडे बहुउद्देशीय संस्था गेल्या अनेक वर्षांपासून भोजनदानाचा उपक्रम सातत्याने राबवत आहे. यावेळी रीमा श्यामू लोखंडे, यशोधरा बलदेव लोखंडे, रमेश ज्योतिरामजी लोखंडे, राजू ज्योतिरामजी लोखंडे, सत्यभामा रमेश लोखंडे, मीनाक्षी राजू लोखंडे, सुदर्शन लोखंडे, सूर्यकांत लोखंडे, आकाश लोखंडे, प्रभात लोखंडे आणि लक्ष्मीकांत लोखंडे यांची उपस्थिती होती. धम्मबांधव- भगिनींचा सहभाग, संस्थेचा सेवाभावी पुढाकार आणि लोखंडे परिवाराचे सहकार्य यांमुळे या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

किशोर गेडाम यांची बसपातर्फे रामटेक लोकसभा क्षेत्राच्या प्रभारीपदी नियुक्ती


दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

बहुजन समाज पार्टीचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेले किशोर गेडाम उर्फ भाऊसाहेब यांची रामटेक लोकसभा निर्वाचन क्षेत्राच्या प्रभारीपदी पुन्हा नियुक्ती करण्यात आली आहे. बहुजन समाज पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनील डोंगरे यांनी त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे. या नियुक्तीमुळे रामटेक लोकसभा क्षेत्रात बहुजन समाज पार्टीचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी तसेच पक्षाची विचारधारा तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी किशोर गेडाम यांना पुन्हा एकदा संधी मिळाली आहे.



या नियुक्तीच्या प्रसंगी बहुजन समाज पार्टीचे राज्य महासचिव मंगेश ठाकरे, राज्य सचिव विवेक हाडके, प्रफुल मानके, जिल्हाध्यक्ष योगेश लांजेवार, जिल्हा उपाध्यक्ष फिरोज खान, रामटेक लोकसभा निर्वाचन क्षेत्राचे दुसरे प्रभारी राजकुमार बोरकर, जिल्हा महासचिव अँड. नंदकिशोर मंडलिक तसेच नागपूर शहर युवा अध्यक्ष सुमित चव्हाण यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेडाम यांच्या पुनर्नियुक्तीमुळे रामटेक लोकसभा क्षेत्रातील बहुजन समाज पार्टीच्या संघटनात्मक कार्याला बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या सहकार्याने आगामी काळात संघटनवाढ, कार्यकर्त्यांशी समन्वय आणि जनतेच्या प्रश्नांवर सक्रिय भूमिका घेण्याच्या दृष्टीने त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे.

साहित्यिका आसावरी ऐनापुरे यांना 'छत्रपती संभाजी महाराज कार्य गौरव पुरस्कार



दै. सिंहवाणी वृत्त, माढा

गिरगाव, मुंबई येथील लेखिका व कवयित्री आसावरी ऐनापुरे यांना 'छत्रपती संभाजी महाराज कार्य गौरव राज्यस्तरीय पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले. शंभू सेना संघटनेच्या वतीने आयोजित दसरा मेळावा व पुरस्कार वितरण सोहळ्यात सौ. आसावरी ऐनापुरे यांच्यासह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एकूण तेरा मान्यवरांचा कार्यगौरव करण्यात आला. मंगळवार दिनांक २० ऑक्टोबर २०२६ रोजी माढा-वैराग रोडवरील जगदाळे फॅमिली हॉल, माढा येथे हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शंभू सेना संघटनेचे संस्थापक सेनाप्रमुख अतुलनाना माने पाटील यांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शंभू सेना संघटनेचे प्रदेशाध्यक्ष किरण भाऊ चव्हाण यांनी भूषवले. या सोहळ्यास संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक दिनेश जगदाळे, शंभूसेना संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष वैभव साळुंखे, माढ्यातील उद्योजक जहीर मेनर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस सचिन रमेश खरे पाटील, सामाजिक कार्यकर्ते गोरख वाकडे आणि शेतकरी नेते बालाजी चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, संघटनेचे पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

आसावरी अभिजीत ऐनापुरे या २०१९ पासून साहित्य क्षेत्रात कार्यरत आहेत. दिवाळी अंक, साप्ताहिक, मासिक, वृत्तपत्र यामधून त्यांचे लेख व कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. दिवाळी अंकांच्या माध्यमातून विविध विषयांवरील अभ्यासपूर्ण लिखाण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात तसेच गोवा आणि अमेरिकेतही पोहोचले आहे. मराठी साहित्यातील कविता, बालककविता, ललित लेख, वैचारिक लेख, प्रवासवर्णन, कथा, लघु कथा, अभंग, चारोळी, पुस्तक परीक्षण, चित्रपट समीक्षा, व्यक्तिचित्र, अनुभव कथन इत्यादी साहित्य प्रकार त्यांनी हाताळले आहेत. दैनिक उल्हास प्रभात बदलापूर आणि दैनिक कोकणदीप यांच्यातर्फे 'साहित्यरत्न' पुरस्कार देऊन २०२५ मध्ये त्यांचा गौरव करण्यात आला आहे. साहित्य क्षेत्रात दिलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्यात आसावरी अभिजीत ऐनापुरे यांच्यासह पुढील मान्यवरांना छत्रपती संभाजी महाराज कार्यगौरव पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

पूर्व महाराष्ट्रातील पायाभूत प्रकल्पांसाठी ६.१७ कोटी मेट्रिक टन राखेच्या वापराचा सामंजस्य करार

ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या उपस्थितीत करारावर स्वाक्षऱ्या, नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली, नागपूर-चंद्रपूर द्रुतगती मार्गासह खनिज वाहतूक मार्गासाठी राखेचा वापर

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई



औष्णिक विद्युत केंद्रांतील राखेचा शाश्वत वापर करून पर्यावरण संवर्धनासह राज्यातील पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देण्यासाठी महानिर्मिती आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या उपस्थितीत हा करार करण्यात आला. या करारानुसार जानेवारी २०२७ ते डिसेंबर २०२८ या कालावधीत पूर्व महाराष्ट्रातील प्रस्तावित द्रुतगती मार्ग आणि खनिज वाहतूक मार्ग प्रकल्पांसाठी सुमारे ६.१७ कोटी मेट्रिक टन राखेचा वापर प्रस्तावित आहे.

महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. आणि एमएसआरडीसीचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार बी. गायकवाड यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) अभय हरणे, कार्यकारी संचालक (पर्यावरण) डॉ. नितीन वाघ, एमएसआरडीसीचे मुख्य व्यवस्थापक (पर्यावरण) नरेंद्र टोके आदी मान्यवर उपस्थित होते.

या करारामुळे महानिर्मितीच्या कोराडी, खापरखेडा आणि चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रांमधील राखेचा वापर राज्यातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी करण्यात येणार आहे. यामध्ये नागपूर-गोंदिया द्रुतगती मार्गासाठी २.०९ कोटी मेट्रिक टन, भंडारा-गडचिरोली द्रुतगती मार्गासाठी १.१४ कोटी मेट्रिक टन, नागपूर-चंद्रपूर द्रुतगती मार्गासाठी २.७९ कोटी मेट्रिक टन आणि नवेगाव मोरे-सुरजागड खनिज वाहतूक मार्गासाठी ०.१५ कोटी मेट्रिक टन राखेची अंदाजित आवश्यकता आहे.

नागपूर परिसरातील प्रकल्पांसाठी कोराडी किंवा खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातून, तर चंद्रपूर परिसरातील प्रकल्पांसाठी चंद्रपूर केंद्रातून राख उपलब्ध करून दिली जाणार आहे. प्रकल्पांची तांत्रिक आवश्यकता, प्रत्यक्ष स्थळस्थिती आणि राखेची उपलब्धता यानुसार वापराच्या प्रमाणात बदल होऊ शकतो.

प्रकल्पनिहाय राखेचे प्रमाण, उचल वेळापत्रक, राखेचा स्रोत, वाहतूक व्यवस्था आणि आर्थिक साहाय्याच्या अटी निश्चित करण्यासाठी संबंधित औष्णिक विद्युत केंद्र, एमएसआरडीसी आणि अधिकृत कंत्राटदार किंवा संबंधित संस्थेदरम्यान स्वतंत्र त्रिपक्षीय करार करण्यात येणार आहेत. राखेचे मोजमाप, वापराचे प्रमाणीकरण आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून पात्र आर्थिक साहाय्याच्या दाव्यांवर कार्यवाही केली जाईल.

राखेचे उत्खनन, वाहतूक, हाताळणी आणि वापर करताना पर्यावरणीय नियम, तांत्रिक मानके आणि वैधानिक तरतुदींचे पालन केले जाणार आहे. केंद्र सरकारच्या ३१ डिसेंबर २०२१ च्या उडती राख अधिसूचनेनुसार राखेचा शंभर टक्के वापर साध्य करणे आणि राज्य शासनाच्या १९ सप्टेंबर २०२५ च्या राख उपयोग धोरणाची अंमलबजावणी करणे, हा या सहकार्याचा महत्त्वाचा उद्देश आहे.

या सामंजस्य करारामुळे औष्णिक विद्युत केंद्रांतील जुन्या राखेचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होण्यास मदत होणार असून, दीर्घकालीन राख साठवणुकीशी संबंधित पर्यावरणीय व कार्यान्वयन जोखीम कमी होण्यास हातभार लागेल. तसेच, राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी राखेच्या शाश्वत वापराची व्यवस्था निर्माण होईल. हा करार ३१ मार्च २०३२ पर्यंत किंवा संबंधित प्रकल्प पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत वैध राहणार आहे. दोन्ही संस्थांच्या सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने कराराची मुदत वाढविता येणार आहे.

रानडुकराला वाचविण्याच्या प्रयत्नात युवक गंभीर जखमी

बोरी : बोरी येथून परभणीकडे जाणाऱ्या बाबाराव गोपाळराव सावळे (वय ३०) यांच्या दुचाकीसमोर अचानक रानडुक्कर आडवे आले. या रानडुकराला वाचविण्याच्या प्रयत्नात दुचाकीवरील ताबा सुटल्याने झालेल्या अपघातात सावळे जखमी झाले आहेत. बोरी येथील रहिवासी असलेले सावळे दुचाकीवरून (क्रमांक एमएच २२ बीजे ७४२७) बोरीहून परभणीकडे जात होते. बोरी शिवारात अचानक शेतातून धावत आलेले रानडुक्कर रस्त्यावर आडवे आले. रानडुकराला वाचविण्याच्या प्रयत्नात त्यांचा दुचाकीवरील ताबा सुटल्याने गाडी घसरून रस्त्यावर पडले. या अपघातात सावळे यांच्या हात व पायाला गंभीर दुखापत झाली. या अपघातात दुचाकीचे मोठे नुकसान झाले आहे. स्थानिक नागरिकांनी तात्काळ धाव घेऊन त्यांना उपचारासाठी बोरी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले.

अकराव्या दिवशी ४८७ श्री दुर्गा देवी मूर्तींचे मनपाच्या कृत्रिम जलकुंडात विसर्जन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नवरात्री उत्सवाच्या अनुषंगाने शहरात श्री दुर्गा देवीच्या मूर्तींचे आगमन झाल्यानंतर विसर्जन पर्यावरणपूरक पद्धतीने व्हावे, यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली आहे. मोठ्या आकाराच्या मूर्तींच्या विसर्जनासाठी गोरेवाडा रिंग रोड, पोलीस लाईन टाकळी आणि कोराडी येथे विशेष कृत्रिम जलकुंड उभारण्यात आले आहेत. शहरातील विविध कृत्रिम तलाव व जलकुंडांमध्ये बुधवारी (ता.२१) रोजी भक्तांनी श्री दुर्गा देवीच्या मूर्तींचे पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जन केले. अकराव्या दिवशी विविध ठिकाणी एकूण ४८७ श्री दुर्गा देवींच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. दोन दिवसता ३२७ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. महापौर निता ठाकरे व मनपा आयुक्त डॉ. विपीन यांच्या मार्गदर्शनात घट विसर्जन व मूर्ती विसर्जन व्यवस्था करण्यात आली. महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी या कृत्रिम तलावांमध्ये क्रेनची व्यवस्था करून विसर्जनाशी मदत केली.

लक्ष्मीनगर झोनमध्ये १ कृत्रिम तलाव उभारण्यात आला असून, येथे ४३ श्री दुर्गा देवींच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. धंतोली झोनमध्ये १ कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली असून, १२ मूर्तींचे विसर्जन झाले. नेहरूनगर झोनमध्ये १ कृत्रिम तलावाची व्यवस्था असून, येथे १३ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. याशिवाय पोलीस लाईन टाकळी येथील कृत्रिम जलकुंडात ६८, गोरेवाडा रिंग रोड जलकुंडात १७२ आणि कोराडी जलकुंडात १७९ श्री दुर्गा देवीच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. अशा प्रकारे शहरातील मनपाद्वारे उभारण्यात आलेल्या विविध कृत्रिम जलकुंडात एकूण ४८७ श्री दुर्गा देवीच्या मूर्तींचे विसर्जन भक्तिभावाने आणि पर्यावरणपूरक पद्धतीने करण्यात आले.

पांधन रस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्यासह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी प्रमोद मोहोड यांचे २७ ऑक्टोबरपासून आमरण उपोषण

काटोल तहसील कार्यालयासमोर आंदोलन, शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधणार

दै. सिंहवाणी वृत्त, काटोल



गावनकाशात आणि महसुली अभिलेखांत नोंद असलेल्या शेतपांधन रस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्यात प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईच्या निषेधार्थ किसान मित्र फाउंडेशन, काटोलचे संस्थापक प्रमोद मोहोड हे मंगळवार, २७ ऑक्टोबर २०२६ पासून काटोल तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसणार आहेत. या आंदोलनाच्या माध्यमातून शेतपांधन रस्त्यांसह शेतकऱ्यांचा विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात येणार असल्याची माहिती मोहोड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मौजा आजनगाव, ता. काटोल, जि. नागपूर येथील सर्व्हे क्रमांक ७ चे शेतमालक सुभाष भाऊराव जिचकार आणि सर्व्हे क्रमांक १२ चे शेतमालक प्रमोद पंजाबराव मोहोड यांच्या शेतात जाण्यासाठी सन १९१२-१३ च्या गावनकाशात शेतपांधन रस्त्याची स्पष्ट नोंद असल्याचे मोहोड यांनी सांगितले. हा रस्ता आजनगाव ते लाखोळी या गावांना जोडणाऱ्या डांबरी रस्त्याला मिळतो. मात्र, त्यांच्या म्हणण्यानुसार, सर्व्हे क्रमांक ३ च्या शेतमालक राजश्री जिचकार आणि सर्व्हे क्रमांक ८ चे शेतमालक सुरेंद्र रामचंद्र जिचकार यांनी शेताच्या बांधावरून जाणारा हा रस्ता बंद केला आहे. रस्ता बंद झाल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्यासाठी मार्ग उपलब्ध नसल्याचा दावा मोहोड यांनी केला. परिणामी, त्यांची शेती पडीत ठेवण्याची वेळ आल्याचेही त्यांनी नमूद केले.

२०२० पासून प्रकरण प्रलंबित असल्याचा आरोप

सदर रस्ता शासकीय नोंदीत असल्याने नियमानुसार अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्याचे अधिकार तहसीलदारांना आहेत, असा मोहोड यांचा दावा आहे. मात्र, सुभाष जिचकार यांच्या प्रकरणात मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६, तर त्यांच्या स्वतःच्या प्रकरणात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अंतर्गत कार्यवाही सुरू असल्याने प्रकरणे २०२० पासून प्रलंबित असल्याचा आरोप त्यांनी केला. शासकीय नकाशात नोंद असलेल्या रस्त्याच्या अतिक्रमणाबाबत प्रशासनाने तातडीने निर्णय घेणे अपेक्षित असताना दिरंगाई होत असल्याचे मोहोड यांनी म्हटले आहे. या प्रशासकीय कार्यपद्धतीला कंटाळून त्यांनी १७ सप्टेंबर २०२६ रोजी महसूल मंत्र्यांना पत्र पाठवून आपली ३.३२ एकर शेतजमीन शासनाला स्मशानभूमीसाठी दान देण्याचा निर्णय कळविल्याचेही सांगितले. मात्र, त्यानंतरही संबंधित प्रश्नांवर ठोस कार्यवाही न झाल्याने आमरण उपोषणाचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बालमजुरीला नकार, समानतेचा स्वीकार! पिंपळगाव राऊतमध्ये विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली

बालहक्कांच्या संरक्षणासह मुलगा-मुलगी समानतेचा जागर, जिल्हा परिषद शाळेत सामाजिक प्रबोधनाचा उपक्रम

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

बालपण हे शिक्षण, खेळ आणि स्वप्नांना आकार देण्याचे वय आहे. मात्र, बालमजुरीमुळे अनेक बालकांचे शिक्षण, आरोग्य आणि उज्ज्वल भविष्य धोक्यात येते. हीच बाब लक्षात घेऊन नरखेड तालुक्यातील पिंपळगाव राऊत येथील जिल्हा परिषद शाळेत बालमजुरी निर्मूलन आणि स्त्री-पुरुष समानतेबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गावातून जनजागृती रॅली काढत बालमजुरीविरोधात आवाज बुलंद केला, तर मुलगा आणि मुली यांना समान हक्क व संधी देण्याचा संदेश ग्रामस्थांपर्यंत पोहोचविला.

Agrigenic Farmer Producer Company Limited And Vijay Cotton and Fiber VO. LLP यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सहभागातून सामाजिक प्रश्नांबाबत जागरूकता निर्माण करणे, बालहक्कांचे महत्त्व पटवून देणे आणि समानतेची मूल्ये समाजात रुजविणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.



गावातून काढण्यात आलेल्या जनजागृती रॅलीत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. बालमजुरी थांबवा, प्रत्येक बालकाला शिक्षणाची संधी द्या, मुलगा-मुलगी भेदभाव दूर करा आणि सर्वांना समान सन्मान द्या, अशा आशयातून सामाजिक प्रबोधन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या या उपक्रमामुळे बालमजुरी आणि लिंगभेदासारख्या गंभीर प्रश्नांकडे ग्रामस्थांचे लक्ष वेधले गेले.

कार्यक्रमात डॉ. बुद्धभूषण वानखेडे, प्रकल्प व्यवस्थापक (पुनरुत्पादक व सेंद्रिय शेती), अमोल जीवतोडे, प्रकल्प अधिकारी आणि आदर्श शिक्षक पुरस्काराप्राप्त नितीन वराडे सर यांनी मार्गदर्शन केले. बालमजुरीमुळे बालकांच्या शारीरिक व मानसिक विकासावर होणारे दुष्परिणाम, शिक्षणापासून वंचित राहण्याचे धोके आणि बालहक्कांच्या संरक्षणाची गरज याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना व उपस्थितांना माहिती दिली.

बालपण कामासाठी नव्हे, तर शिक्षण आणि स्वप्नपूर्तीसाठी!

मार्गदर्शन करताना बालमजुरीमुक्त समाज घडविण्यासाठी केवळ शासनाच्या प्रयत्नांवर अवलंबून न राहता पालक, शिक्षक, ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांनीही जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही मुलाला शिक्षणापासून दूर राहावे लागू नये, तसेच प्रत्येक बालकाला सुरक्षित वातावरणात शिकण्याची आणि प्रगती करण्याची संधी मिळावी, वासाही समाजाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त नितीन वराडे सर यांनी स्त्री-पुरुष समानतेचा मुद्दा अधोरेखित करत मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव न करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. शिक्षण, क्रीडा, घरातील जबाबदाऱ्या, निर्णयप्रक्रिया आणि सामाजिक सहभाग या प्रत्येक क्षेत्रात मुला-मुलींना समान संधी मिळाली पाहिजे. मुलींना कमी लेखण्याची मानसिकता बदलून त्यांना स्वावलंबी होण्यासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. लहान वयापासून समानतेचे संस्कार रुजविल्यास भविष्यात भेदभावमुक्त आणि न्याय्य समाज निर्माण होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला पिंपळगाव राऊतचे उपसरपंच मोहन निंबाळकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी अशा सामाजिक जनजागृती उपक्रमांमुळे गावात सकारात्मक विचारांची रुजवण होत असल्याचे नमूद करून बालमजुरी रोखण्यासाठी आणि स्त्री-पुरुष समानतेची भावना वाढविण्यासाठी ग्रामस्थांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी क्षेत्रीय अधिकारी पंकज निंबाळकर यांनी पुढाकार घेतला. जिल्हा परिषद शाळेतील वैभव इंगोले सर यांनीही कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि गावातून काढण्यात आलेल्या रॅलीमुळे बालहक्क, शिक्षणाचे महत्त्व आणि समानतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यास मदत झाली.

बालमजुरी निर्मूलन ही केवळ एका दिवसाची जनजागृती नसून प्रत्येक बालकाच्या भविष्याशी निगडित सामाजिक जबाबदारी आहे. प्रत्येक मुलाच्या हातात कामाची साधने नव्हे, तर पुस्तक असावे; प्रत्येक मुलीला दुय्यम स्थान नव्हे, तर समान सन्मान मिळावा, हीच या उपक्रमामागील महत्त्वपूर्ण भावना होती.

बालपण शिक्षणासाठी, बालमजुरीला नकार; मुलगा-मुलगी समानतेतून घडवूया सक्षम आणि भेदभावमुक्त समाज! हा प्रेरणादायी संदेश देत पिंपळगाव राऊत येथील जनजागृती कार्यक्रमाने सामाजिक परिवर्तनाची जाणीव करून दिली.

थोडक्यात

बनगावात चांदीचे दोन मुकुट चोरीला, ४० हजारांचा ऐवज लंपास

दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बनगाव येथे चांदीचे दोन मुकुट चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या चोरीमध्ये अंदाजे ४० हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास झाला असून, याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध आमगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांत दाखल नोंदीनुसार, बनगाव येथील फिर्यादी प्रमोद ईश्वरदास महारवाडे (वय ४३ वर्षे) यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. चोरीची घटना २१ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ८ वाजल्यापासून २२ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपर्यंतच्या कालावधीत, बनगावपासून पश्चिमेकडे सुमारे एक किलोमीटर अंतरावरील माता मंदिर येथे घडल्याची नोंद आहे. चोरीस गेलेल्या वस्तूंमध्ये अंदाजे २०० ग्रॅम वजनाचा एक चांदीचा मुकुट, किंमत सुमारे २० हजार रुपये, तसेच अंदाजे २०० ग्रॅम वजनाचा दुसरा चांदीचा मुकुट, किंमत सुमारे २० हजार रुपये, अशा एकूण ४० हजार रुपये किमतीच्या ऐवजाचा समावेश आहे. पोलिसांच्या नोंदीनुसार, चोरी गेलेला माल अद्याप मिळालेला नाही.



या प्रकरणी आमगाव पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ६७१/२०२६, भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम ३०५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार मानकर (बक्कल क्रमांक १२३७) यांनी गुन्हा दाखल केला असून, पोलीस हवालदार बर्वे (बक्कल क्रमांक ५६२) हे तपास करीत आहेत. चांदीचे दोन मुकुट चोरीला गेल्याने परिसरात चर्चेला उधाण आले आहे. चोरीच्या या प्रकरणाचा तपास आमगाव पोलीस करीत असून, चोरीस गेलेला ऐवज आणि अज्ञात आरोपीचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक नीलकंठ कुकडे यांच्या मार्गदर्शनात पोलीस हवालदार खुशालचंद बर्वे करीत आहेत.

आमगावच्या भवभूति महाविद्यालयाचा पॉवरलिफ्टिंगमध्ये डंका!

नागपूर विद्यापीठ आंतर-महाविद्यालयीन स्पर्धा: सूरजला रौप्य, तर भोलाला कांस्य पदक



दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातर्फे नुकत्याच आयोजित आंतर-महाविद्यालयीन पॉवरलिफ्टिंग स्पर्धा २०२६-२७ मध्ये आमगावच्या भवभूति महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन करत महाविद्यालयाचा नावलौकिक उंचावला आहे. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या दोन प्रतिभावंत विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत एक रौप्य आणि एक कांस्य पदक आपल्या नावावर केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रल्हाद रहांगडाले आणि शारीरिक शिक्षण संचालक डॉ. तुषार जुमडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हा पराक्रम गाजवला. यामध्ये बी.ए. प्रथम वर्षाचा विद्यार्थी सूरज ब्राह्मणकर याने ७४ किलो वजन गटात उत्कृष्ट प्रदर्शन करत रौप्य पदक पटकावले, तर बी.ए. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी भोला रगडे याने ८३ किलो वजन गटात अटीतटीच्या सामन्यात शानदार खेळ करत कांस्य पदक आपल्या नावावर केले.

विद्यार्थ्यांच्या या गौरवास्पद यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रल्हाद रहांगडाले यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा यथोचित सत्कार केला आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्यात. या उल्लेखनीय यशाबद्दल हिंदी विभागप्रमुख डॉ.रमेश बावनथडे, डॉ. नितीन ढगि, डॉ. विशाल राठोड, प्रा. जयंत नाकाडे यांच्यासह सर्व प्राध्यापक वृंद आणि महाविद्यालयीन परिवारामधून विजेत्या खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. या यशाने संपूर्ण महाविद्यालय परिसर व क्रीडा वर्तुळात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

हिवाळी अधिवेशनासाठी पदांची भरती

लिपिक-टंकलेखकाची १०, तर शिपाई-संदेशवाहकाची २४ पदे; पात्र उमेदवारांना संधी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र विधिमंडळाच्या नागपूर येथे होणाऱ्या आगामी हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर लिपिक-टंकलेखक आणि शिपाई/संदेशवाहक या पदांवर एकूण ३४ उमेदवारांची तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात येणार आहे. यामध्ये लिपिक-टंकलेखकाची १० आणि शिपाई/संदेशवाहकाची २४ पदे आहेत. इच्छुक व पात्र उमेदवारांनी ९ नोव्हेंबरपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोमवार, ७ डिसेंबर २०२६ पासून विधानभवन, नागपूर येथे सुरू होणार आहे. या अधिवेशनाच्या कालावधीसाठी पूर्णतः हंगामी स्वरूपात ही पदे भरली जाणार आहेत. लिपिक-टंकलेखक पदासाठी एस-६ वेतनश्रेणी (१९,९०० ते ६३,२०० रुपये), तर शिपाई/संदेशवाहक पदासाठी एस-१ वेतनश्रेणी (१५,००० ते ४७,६०० रुपये) लागू राहील. याशिवाय नियमानुसार देय भत्ते मिळतील.

लिपिक-टंकलेखक पदासाठी पात्रता

या पदासाठी उमेदवार बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच मराठी टंकलेखनाचा वेग प्रतिमिनिट ३० शब्द आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग प्रतिमिनिट ४० शब्द असावा. उमेदवाराने एमएस-सीआयटी किंवा समकक्ष संगणक परीक्षा उत्तीर्ण असावी. खुल्या प्रवर्गासाठी वयोमर्यादा १८ ते ३८ वर्षे, तर मागासवर्गीय उमेदवारांसाठी १८ ते ४३ वर्षे आहे.

शिपाई-संदेशवाहक पदासाठी पात्रता

शिपाई/संदेशवाहक पदासाठी किमान चौथी उत्तीर्ण किंवा त्यापेक्षा उच्च शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांचे वय १८ ते ३८ वर्षे, तर मागासवर्गीय उमेदवारांचे वय १८ ते ४३ वर्षे असावे. याशिवाय सायकल किंवा दुचाकी चालविता येणे आवश्यक आहे. शिपाई/संदेशवाहक पदासाठी पात्र उमेदवारांची मौखिक चाचणी गुरुवार, २६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजल्यापासून विधानभवन, नागपूर येथे घेण्यात येईल. लिपिक-टंकलेखक पदासाठी पात्र उमेदवारांची टंकलेखन चाचणी शनिवार, २८ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजल्यापासून होणार आहे.

दिल्ली महानगरपालिकेत अभूतपूर्व राडा

भाजप-आप नगरसेवक भिडले

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

दिल्ली महानगरपालिका भवनात प्रदूषणावरील चर्चेदरम्यान अभूतपूर्व राडा झाला. नगरसेवकांनी मायक्रोफोन तोडण्याचा आणि फायली फेकण्याचा प्रयत्न केला. दिल्लीतील प्रदूषणाचा सामना कसा करायचा यावर चर्चा करण्यासाठी सभागृहात बैठक होणार होती. मात्र, बैठकीचे रूपांतर लगेचच जोरदार वाद, धक्काबुक्की आणि तोडफोडीत झाले. भाजप आणि 'आप'च्या नगरसेवकांनी एकमेकांवर ओरडले, पाणी फेकले आणि फायली फेकल्या. यात काँग्रेसचे नगरसेवकही सामील होते. परिस्थिती इतकी चिघळली की मार्शलना हस्तक्षेप करून महापौर परवेश वाही यांना सुरक्षित स्थळी न्यावे लागले.

'आप'च्या नगरसेवकांनी त्यांच्या प्रभागांच्या विकासासाठी निधी तत्काळ देण्याची मागणी केल्यावर हा वाद सुरू झाला. महापौर वाही यांनी तत्काळ २५ लाख रुपयांची घोषणा केली आणि सांगितले की या आर्थिक वर्षात नगरसेवकांना एकूण २ कोटी रुपये दिले जातील. महापौरांच्या या घोषणेने विरोधकांचे समाधान झाले नाही. आपच्या नगरसेवकांनी हा तत्काळ निधी किमान १ कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याची मागणी केली. या मुद्द्यामुळे दोन्ही बाजूंमधील वाद आणखी वाढला.या गदारोळादरम्यान, आपच्या नगरसेविका शगुफ्ता झुबेर महापौरांच्या खुर्चीपर्यंत पोहोचल्या. प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, त्यांनी तेथे लावलेला मायक्रोफोन तोडण्याचा प्रयत्न केला.



विरोधी पक्षनेते अंकुश नारंग यांच्यावरही मायक्रोफोनचे नुकसान केल्याचा आरोप आहे. काँग्रेस नेत्या नाझिया दानिश आणि आपचे अंकुश नारंग यांच्यात बाचाबाची झाल्यावर हा वाद आणखी वाढला. दानिश यांनी आपवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले, तर नारंग यांनी त्यांच्यावर भाजपसोबत संगनमत केल्याचा आरोप केला.

दानिश यांनी प्रत्युत्तर देताना म्हटले की, त्या शगुफ्ता चौधरी नाहीत, ज्या भाजपमध्ये सामील होतील. या वादामुळे सभागृहातील वातावरण आणखी तापले. हे संपूर्ण प्रकरण आता सभागृह शिस्तपालन समितीकडे सोपवण्यात आले आहे, जी आरोपी नगरसेवकांच्या वर्तणुकीची चौकशी करून कारवाईचा निर्णय घेईल.

स्वरा इंगोलेची विभागीयस्तरीय जिम्नॅस्टिक्स स्पर्धेसाठी निवड

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा : नागपूर जिल्हा ग्रामीण जिल्हास्तरीय शालेय जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत सेंट ॲन्स इंग्लिश मीडियम स्कूल, दहेगाव (रं.) येथील इयत्ता सहावीची विद्यार्थिनी स्वरा खुशाल इंगोले हिने प्राविण्य प्राप्त केले असून, तिची नागपूर विभागीय जिम्नॅस्टिक्स स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर व क्रीडा परिषद, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धा २१ व २२ ऑक्टोबर २०२६ रोजी तालुका क्रीडा संकुल, कोराडी येथे पार पडल्या. विभागीय स्पर्धा २६ ऑक्टोबर २०२६ रोजी याच क्रीडा संकुलात होणार असून, स्वरा नागपूर जिल्हा ग्रामीणचे प्रतिनिधित्व करणार आहे. जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षक ऋषिकेश वराडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नियमित प्रशिक्षणामुळे स्वराने हे यश संपादन केले.



स्वराच्या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर फ्लिओफस, व्यवस्थापिका सिस्टर सिरिया पुष्पम, उपमुख्याध्यापिका सिस्टर प्रीती, क्रीडा विभागप्रमुख खुशाल इंगोले, क्रीडा शिक्षक प्रतीक उमाप व सिद्धार्थ मगाडे तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

'पुस्तकांशी मैत्री करा, पर्यावरणाशी नाते जोडा!'

लेखक संजय ऐलवाड यांचा बेल्हे येथील विद्यार्थ्यांशी ऑनलाइन संवाद

दै. सिंहवाणी वृत्त, पुणे

'अक्षर साक्षर झालो, आता पर्यावरण साक्षर होण्याची गरज आहे. भाज्या आणि फळे हा निरोगी जीवनाचा पाया आहे, तर पुस्तके मानवी आयुष्याला आकार देतात. त्यामुळे निसर्गाशी मैत्री करा, पुस्तकांशी नाते जोडा आणि मोबाईलच्या अतिवापरापासून दूर राहा,' असा मोलाचा संदेश बालसाहित्यिक संजय ऐलवाड यांनी विद्यार्थ्यांना दिला.'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत बालभारतीच्या इयत्ता तिसरीच्या पाठ्यपुस्तकातील 'शुभ्राची परसबाग' या कथेचे लेखक संजय ऐलवाड यांनी पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बेल्हे नंबर एक येथील विद्यार्थ्यांशी ऑनलाइन संवाद साधला. या वेळी त्यांनी दैनंदिन जीवनातील सवयी, आहार, पर्यावरण, खेळ आणि वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.





मानवी शरीराची योग्य वाढ, बुद्धीचा विकास आणि निरोगी आयुष्यासाठी पालेभाज्या, फळभाज्या आणि फळे यांचे सेवन आवश्यक आहे. भाज्यांमधून शरीराला विविध पोषक घटक मिळतात. त्यामुळे लहानपणापासूनच आहारात भाज्या आणि फळांचा समावेश करण्याची सवय लावली पाहिजे. शुभ्राची परसबाग या कथेच्या माध्यमातून मुलांनी परसबागेची संकल्पना समजून घ्यावी, फळभाज्या, पालेभाज्यांसह झाडे लावावीत, त्यांची काळजी घ्यावी आणि निसर्गाचे महत्त्व ओळखावे, असे आवाहनही त्यांनी केले. सतत मोबाईल पाहिल्याने डोळ्यांवर ताण येऊ शकतो, डोकेदुखीचा त्रास होऊ शकतो. चुकीच्या स्थितीत दीर्घकाळ बसल्याने मणक्याच्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे मोबाईलच्या आहारी न जाता त्याचा मर्यादित वापर करावा. अभ्याससह मुलांनी खेळासाठीही पुरेसा वेळ दिला पाहिजे. मैदानी खेळांमुळे शरीर सुदृढ राहते, मन प्रसन्न होते आणि मुलांमध्ये संघभावना विकसित होते. पुस्तके केवळ माहिती देत नाहीत, तर विचार करण्याची क्षमता वाढवतात, कल्पनाशक्तीला चालना देतात आणि व्यक्तिमत्त्व घडवतात. त्यामुळे पुस्तकांना आपले मित्र बनवा, नियमित वाचन करा, असे त्यांनी सांगितले. लेखकाच्या थेट संवादामुळे पाठ्यपुस्तकातील कथेच्या पलीकडे जाऊन जीवनोपयोगी विचार जाणून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक सखाराम शेंडकर, सहशिक्षक संतोष डुकरे, शिक्षिका मीरा बेलकर आदी उपस्थित होते.

अमरावतीतून अपहरण झालेल्या पाच वर्षीय बालकाची आमगावात सुखरूप सुटका!

आमगाव पोलिसांची तत्पर कारवाई, रेल्वे स्टेशन रोड परिसरातून बालकाचा शोध, अमरावती पोलिसांकडे सुपूर्द

दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव

अमरावती येथून अपहरण करण्यात आलेल्या पाच वर्षांच्या बालकाचा आमगाव पोलिसांनी तत्परतेने शोध घेतला. आमगाव येथील रेल्वे स्टेशन रोड परिसरात बालक आढळून आल्यानंतर पोलिसांनी त्याची खातरजमा करून त्याला अमरावती पोलिसांच्या ताब्यात दिले. या कारवाईमुळे बालकाचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ ऑक्टोबर २०२६ रोजी अमरावती गुन्हे शाखेकडून आमगावचे पोलीस निरीक्षक यांना माहिती मिळाली की, अमरावती येथून एका पाच वर्षीय बालकाचे अपहरण करण्यात आले असून, तो आमगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रेल्वे स्टेशन रोड परिसरात रामचरण गुप्ता यांच्या घरी असल्याची शक्यता आहे. माहिती मिळताच आमगाव पोलीस ठाण्यातील डीबी पथकाचे प्रमुख हेड कॉन्स्टेबल मणियार यांना याबाबत कळवून शोधकार्यासाठी रवाना करण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक निळकंठ कुकडे हेही आपल्या पथकासह बालकाचा शोध घेण्यासाठी घटनास्थळी रवाना झाले.



घराची झडती घेताच बालक आढळले

पोलिसांनी रामचरण गुप्ता यांच्या घराचा शोध घेतला. घरात प्रवेश केल्यानंतर पाच वर्षांचे बालक बेडवर झोपलेल्या अवस्थेत आढळून आले. पोलिसांनी बालकाचे छायाचित्र अमरावती येथील राजापेठ पोलीस ठाण्यातील पथकाकडे पाठविले. छायाचित्राच्या आधारे संबंधित बालकाची ओळख पटविण्यात आली. त्यानंतर बालकाला सोबत घेऊन अमरावती येथील गुन्हे शाखेला माहिती देण्यात आली. या प्रकरणी अमरावती शहरातील राजापेठ पोलीस ठाण्यात अप क्रमांक ९०२/२०२६ नुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास राजापेठ पोलीस ठाण्यात सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक निळकंठ कुकडे, पोलीस उपनिरीक्षक अतुल कोलते, पोहेकॉ ठाकरे, मणियार, पोलीस शिपाई अजय पटले, अरुण बोहरे आणि अजय इंगळे यांनी या कारवाईत सहभाग घेतला. आमगाव पोलिसांनी अमरावती पोलिसांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तातडीने शोधमोहीम राबवून बालकाचा शोध घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

नितीन गडकरी यांच्या हस्ते अनाथ बालिकेचा औपचारिक स्वीकार सोहळा संपन्न

ऑटिझमग्रस्त साडेचार वर्षीय बालिकेला पुढील उपचार व संगोपनासाठी मध्य प्रदेशातील सेवाधाम आश्रमात पाठविणार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या शुभहस्ते नागपूर येथील गडकरी वाड्यात १८ ऑक्टोबर रोजी ऑटिझम आजाराने ग्रस्त असलेल्या साडेचार वर्षीय अनाथ बालिकेच्या औपचारिक स्वीकाराचा सोहळा पार पडला. बालिकेच्या पुढील वैद्यकीय उपचारांसह संगोपन व पुनर्वसनाच्या दृष्टीने तिला मध्य प्रदेशातील उज्जैन येथील सेवाधाम आश्रमात पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या उपक्रमामुळे विशेष काळजीची गरज असलेल्या बालिकेला योग्य उपचार, सुरक्षित वातावरण आणि आवश्यक संगोपन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सदर बालिका मागील चार वर्षांपासून बालकल्याण समितीच्या आदेशाने न्यू एनर्जी बहुउद्देशीय संस्थेत दाखल होती. या कालावधीत बालरोगतज्ज्ञ डॉ. रवी दुदानी यांच्या मार्गदर्शनाखाली तिच्यावर विविध वैद्यकीय उपचार व औषधोपचार करण्यात आले. मात्र, बालिकेच्या प्रकृतीत अपेक्षित सुधारणा दिसून आली नाही. त्यामुळे तिच्या पुढील उपचारांसाठी आणि दीर्घकालीन संगोपनासाठी विशेष सुविधा असलेल्या संस्थेत पाठविण्याची आवश्यकता निर्माण झाली. महाराष्ट्रात अशा विशेष गरजा असलेल्या बालिकेच्या सर्वांगीण काळजीसाठी योग्य व्यवस्था उपलब्ध नसल्याने मध्य प्रदेशातील उज्जैन येथील सेवाधाम आश्रमाची निवड करण्यात आली. नागपूरच्या बालकल्याण समितीच्या आदेशानुसार बालिकेला पुढील काळजी, संरक्षण आणि उपचारांसाठी सेवाधाम आश्रमात पाठविण्यात येणार आहे. या संस्थेत बालिकेच्या गरजांनुसार उपचार आणि संगोपनाची व्यवस्था करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.



नागपूर येथील गडकरी वाड्यात आयोजित या कार्यक्रमाला नितीनजी गडकरी यांच्यासह माजी आमदार गिरीश व्यास, सेवाधाम आश्रमाचे संचालक सुधीरजी गोयल, न्यू एनर्जी बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष चंद्रमणी गोंडाणे आणि सचिव सनमकुमार गोंडाणे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या उपस्थितीत बालिकेच्या पुढील संगोपन व उपचारांसंदर्भातील प्रक्रिया पार पडली.

यावेळी बालकल्याण समितीच्या अध्यक्षा छाया राऊत, सदस्य शिवशंकर सेलोकर, सदस्य विनायक नंदेश्वर, सदस्या विजया शाह, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुनील मेसरे, जिल्हा बालसंरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण, विनोद शेंडे तसेच बालरोग तज्ज्ञ डॉ. रवी दुदानी उपस्थित होते. याशिवाय न्यू एनर्जी बहुउद्देशीय संस्थेच्या अधीक्षिका पूजा झोडे, समीक्षा भेत्राम, निलिमा आवळे आणि सुषमा धनविजय यांच्यासह अन्य मान्यवरांनी कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली.

विशेष बालकांच्या संगोपनासाठी संवेदनशील पुढाकार

ऑटिझमग्रस्त बालकांना योग्य वैद्यकीय उपचार, सुरक्षित वातावरण, नियमित देखभाल आणि विशेष मार्गदर्शनाची आवश्यकता असते. अशा बालकांच्या भवितव्यासाठी केवळ वैद्यकीय उपचार पुरेसे नसून त्यांच्या दैनंदिन गरजा आणि सर्वांगीण विकासाकडेही लक्ष देणे महत्त्वाचे असते. या पार्श्वभूमीवर संबंधित बालिकेला विशेष काळजी व उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला. बालिकेच्या पुढील आयुष्यात तिला आवश्यक वैद्यकीय मदत, संरक्षण आणि संगोपन मिळावे, या दृष्टीने विविध यंत्रणा आणि संस्थांनी समन्वयाने पुढाकार घेतला आहे.

विशेष गरजा असलेल्या अनाथ बालकांना योग्य आधार मिळवून देण्यासाठी प्रशासन, सामाजिक संस्था आणि वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ यांच्यातील समन्वय किती महत्त्वाचा आहे, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले आहे. गडकरी यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या स्वीकार सोहळ्यामुळे बालिकेच्या पुढील उपचार व संगोपनासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून, तिला सुरक्षित आणि आधारपूर्ण वातावरण मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

थोडक्यात

कहाली ग्रामपंचायत अंतर्गत वार्ड क्रमांक २ मध्ये अपघातांचे सत्र, गतिरोधक बसविण्याची ग्रामस्थांची मागणी

तीन महिन्यांत २ ते ३ अपघात, स्कूटीच्या धडकेत दोन वर्षांच्या चिमुकलीच्या पायाची हाडे फ्रॅक्चर



दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

कहाली ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वार्ड क्रमांक २ मधील रस्ता अपघातांचा केंद्रबिंदू ठरत असून, गेल्या तीन महिन्यांत येथे दोन ते तीन अपघात घडल्याची माहिती समोर आली आहे. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे ग्रामस्थांमध्ये चिंता व्यक्त केली जात असून, संबंधित रस्त्यावर तातडीने गतिरोधक बसविण्याची मागणी जोर धरत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १७ रोजी पुन्हा एक अपघात घडला. पांढरी येथील दोन व्यक्ती स्कूटीवरून वेगाने जात असताना दोन वर्षांच्या चिमुकलीला धडक बसल्याची माहिती आहे. या अपघातात चिमुकलीच्या पायाची हाडे दोन ते तीन ठिकाणी फ्रॅक्चर झाल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, पोलिस प्रशासनाकडून या प्रकरणाची चौकशी सुरू आहे.

बाहेरील रस्त्यावरील खड्ड्यांमुळे गावातील अंतर्गत रस्त्यावर वाहतुकीचा ताण

कहाली गावाबाहेरील रस्ता हा बाहेरील भागातून ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या वाहतुकीसाठी महत्त्वाचा आहे. मात्र, या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्यामुळे वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिणामी, अनेक वाहनचालक गावातील अंतर्गत रस्त्याचा वापर करीत असल्याने या रस्त्यावर वाहतुकीची गर्दी वाढत आहे. वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे अपघातांचा धोका अधिकच वाढला आहे.


निंबा-कहाळी व पांगाव-कहाली रस्त्यांच्या दुरुस्तीची मागणी

गावातील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने निंबा-कहाली आणि पांगाव-कहाळी या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. त्याचबरोबर कहाली येथील वार्ड क्रमांक २ मधील अपघातप्रवण ठिकाणी गतिरोधक बसवून वाहनांच्या वेगावर नियंत्रण आणावे, अशीही मागणी होत आहे. लहान मुलांसह पादचारी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, संबंधित प्रशासन व ग्रामपंचायतीने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम २५ ऑक्टोबरला

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी महाल येथील गडकरी वाडा येथे आयोजित करण्यात आला आहे. महालातील गडकरी वाडा येथे मंत्री महोदय यांच्या जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची निवेदने स्वीकारतील. मंत्री महोदय नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपातच (आवश्यक कागदपत्रे जोडून) आणाव्यात. तसेच आपली लेखी निवेदने मंत्री महोदयांना द्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारी १ ते २ या कालावधीत नितीन गडकरी आपल्या जनसंपर्क कार्यालयात भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटतील.



चनकापूरमध्ये रावण दहन सोहळ्याला हजारों नागरिकांची उपस्थिती! प्रभू श्रीरामांच्या वेशातील चिमुकल्याच्या हस्ते रावण दहन



दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

विजयादशमीनिमित्त चनकापूर येथील वेकोलीच्या क्रीडा मैदानावर रावण दहन उत्सव समितीच्या वतीने भव्य रावण दहन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्याला परिसरातील सुमारे हजारों नागरिकांनी उपस्थिती लावत उत्सवाची शोभा वाढवली. प्रभू श्रीरामांच्या वेशभूषेतील चिमुकल्याच्या हस्ते रावणाच्या भव्य पुतळ्याचे दहन करण्यात आले. यावेळी जय श्रीरामच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमाला मुख्य आयोजक तथा माजी उपसभापती राहुल तिवारी माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश खापरे, चिचोली खापरखेडा ग्रामपंचायतीच्या सरपंच मीनाक्षी तागडे,पोटा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच पवन धुर्वे, माजी उपसरपंच विश्वजित सिंह तसेच खापरखेडा पत्रकार संघाचे कपिल वानखेडे, अभय मिश्रा,मयूर तिरपुडे,विक्की थापा, रणजित सिंग, प्रदीप कमाले आदी मान्यवर उपस्थित होते.

हा भव्य सोहळा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या पोलीस प्रशासनाचे, उत्सव समितीच्या कार्यकर्त्यांचे आणि नागरिकांचे आयोजकांनी आभार मानले, कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अमित भगत, संकेत पाटील, राजेंद्र गुप्ता, सोनल श्रीवास्तव,विनोद प्रसाद, उदेश पाटील, निखिल पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

सुधाकर कोहळे ३० हजार मतांच्या फरकाने विजयी

सामायिक जमिनीच्या मोजणीशिवाय नोंदणी नाही, राज ठाकरे यांच्या विधानावर मिश्किल टिप्पणी, रोहित पवारांची पत्रकार परिषद म्हणजे नौटंकी : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे



फ्रेंडशिप फाईल्सवरून पंतप्रधान नरेंद्र मोदींना लक्ष्य करणे चुकीचे

फ्रेंडशिप फाईल्स डॉक्युमेंटरीच्या संदर्भात बोलताना बावनकुळे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या पंचवीस वर्षांपासून सार्वजनिक जीवनात आहेत. देशाचा आणि राज्याचा विकास करायचा असेल, तर व्यवसाय आणि उद्योग क्षेत्रही महत्त्वाचे आहे. त्यामुळे व्यावसायिकांसोबत बैठका होणे किंवा त्यांच्या समस्या समजून घेणे, याचा अर्थ सरकार त्यांना अनुचित मदत करते, असा होत नाही.

देशाचा विकास साधायचा असेल, तर व्यावसायिकांच्या अडचणी समजून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या फाईल्स तयार करून अदानी आणि अंबानी यांच्याशी संबंध असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न करणे चुकीचे आहे, असे ते म्हणाले. काँग्रेसने ६५ वर्षे देशात सत्ता उपभोगली. आता केंद्रातील सत्तेपासून दूर असल्याने नकारात्मकता पसरवून जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र, देशाची जनता विकासाच्या पाठीशी आहे, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

तक्रार आल्यास मनोज जरांगे यांच्या आरोपांची चौकशी

मनोज जरांगे यांनी केलेल्या आरोपांबाबत विचारले असता बावनकुळे म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली आहे. संबंधित व्यक्तीने सरकारकडे रीतसर तक्रार केली, तर तिची चौकशी करण्यात येईल. मला मनोज जरांगे यांच्याबद्दल काहीही बोलायचे नाही. त्यांना जे बोलायचे आहे, ते बोलण्यास ते स्वतंत्र आहेत.

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर पदवीधर मतदारसंघात महायुतीचे उमेदवार सुधाकर कोहळे हे ३० हजार मतांच्या फरकाने विजयी होतील, असा विश्वास महसूलमंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी नागपूरला प्रसार माध्यमांशी संवाद साधला.

नागपूर पदवीधर मतदारसंघात महायुतीचे उमेदवार सुधाकर कोहळे यांना विजयी करण्यासाठी आपण संपूर्ण जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्यात मतदारांशी संवाद साधला असता, सरकारच्या माध्यमातून आपले प्रश्न सुधाकर कोहळे सोडवू शकतात, अशी भावना मतदारांमध्ये दिसून आली. पदवीधरांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून काम करण्यास कोहळे योग्य आहेत. त्यामुळे ते ३० हजार मतांच्या फरकाने विजयी होतील, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला.

सामायिक जमिनीच्या मोजणीशिवाय नोंदणी होणार नाही

सातबारा उताऱ्यावरील नव्या नियमाबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले, सामायिक शेतीच्या जमिनीची मोजणी करून प्रत्येकाचा हिस्सा निश्चित केल्याशिवाय जमिनीची नोंदणी करता येणार नाही. या निर्णयामुळे जमिनीच्या हिश्शांवरून निर्माण होणारे वाद टाळता येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

वापूर्वी एका सातबारा उताऱ्यावर चार व्यक्तींची नावे असतानाही त्यातील एखादी व्यक्ती जमिनीची विक्री करू शकत होती. मात्र, विक्रीनंतर प्रत्यक्ष जमिनीवर गेल्यावर कोणाच्या वाट्याला कोणता भाग आला, यावरून वाद निर्माण होत होते. त्यामुळे न्यायालयात खटले दाखल होत होते आणि राज्यात मोठ्या प्रमाणावर वाद निर्माण झाले होते. हे वाद टाळण्यासाठी आता सामायिक शेतीच्या जमिनीची मोजणी करून प्रत्येकाचा हिस्सा वेगळा केल्याशिवाय विक्री करता येणार नाही. सामायिक जमिनीची मोजणी झाल्याशिवाय नोंदणीही होणार नाही. या निर्णयामुळे जमिनीच्या हिश्शांवरून निर्माण होणारे वाद टाळण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

तुकडेबंदी कायद्याबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले, संबंधित कायदेशीर तरतुदी रद्द केल्यामुळे जमिनीचे निवासी वापरासाठी रूपांतर करून त्यानंतर विक्री करता येईल.

'दिवाळी आली की, फटाके फुटतात'

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विधानाबाबत विचारले असता बावनकुळे यांनी मिश्किल टिप्पणी केली. ते म्हणाले, दिवाळी आली की फटाके फुटतात. त्यामुळे दिवाळीचा एक फटाका फुटला.

सावनेरमध्ये भरधाव कारची दुचाकीला जोरदार धडक; चालक पोलिसांच्या ताब्यात, दुचाकीस्वार गंभीर जखमी

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा





दि. २१ ऑक्टोबर सावनेर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ बुधवारी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास कार आणि दुचाकीमध्ये भीषण अपघात झाला. भरधाव वेगाने आलेल्या कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वार सिद्धांत उत्तम आकरे यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर कारचालक घटनास्थळावरून निघून गेल्याची माहिती असून, पोलिसांनी संबंधित कारचालकाला ताब्यात घेतल्याचे सांगण्यात आले.

जखमी सिद्धांत उत्तम आकरे वय ३७ हे मूळचे राजुरा, जिल्हा चंद्रपूर येथील रहिवासी असून, सध्या सावनेर येथे वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड मध्ये कार्यरत आहेत.

अपघाताची माहिती स्थानिक नागरिकांनी सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना दिली. त्यांनी तत्काळ सावनेरचे उपविभागीय पोलीस अधिकारी सागर खडें यांना घटनेची माहिती कळवली. माहिती मिळताच अढक दत्ता कानगुडे आपल्या पोलीस पथकासह घटनास्थळी दाखल झाले.

दरम्यान, हितेश बनसोड यांनी स्वतःच्या रुग्णवाहिकेतून जखमीला तातडीने सावनेर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथे डॉक्टरांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी जखमीला आशा हॉस्पिटल, कामटी येथे हलविण्यात आल्याची माहिती आहे.

या अपघातात कार क्रमांक MH 40 AR 6234 आणि दुचाकी क्रमांक MH 34 CH 8415 यांचा समावेश होता. पोलिसांनी कार ताब्यात घेतल्याची माहिती असून, अपघातासंदर्भातील पुढील कारवाई सुरू असल्याचे समजते. घटनास्थळी उपस्थित काही नागरिकांनी कारचालक मद्यधुंद अवस्थेत असल्याचा संशय व्यक्त केला. मात्र, मद्यप्राशनाबाबत अधिकृत पुष्टी उपलब्ध नसल्याने याबाबत पोलिसांच्या तपासानंतरच स्पष्टता येणार आहे. गुन्हा दाखल झाला आहे की नाही, याचीही अधिकृत माहिती अद्याप उपलब्ध नाही. अपघाताचा पुढील तपास सावनेर पोलीस करीत आहे.

नागपूर - लोधा हॉलटिंग एस. टी. बस टूयापार मार्गे सुरु

राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांचे मानले आभार



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

रामटेक तालुक्यातील टूयापार गावातील नागरिकांनी नागपूर - लोधा एस. टी. बस ही टूयापार मार्गे सुरु करण्याबाबत राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांना निवेदन देण्यात आले होते. त्या निवेदनाची दखल घेत बस सेवा सुरु करण्याबाबत राज्य परिवहन विभागिय कार्यालय, नागपूर यांना पत्र पाठविण्यात आले. त्या अनुसंगाने ग्रामीण भागातील प्रवाशांची व विद्यार्थ्यांची सोय व्हावी यासाठी दिनांक २० ऑक्टोंबर २०२६ रोजी नागपूर ते लोधा ही एसटी बस सेवा टूयापार मार्गे सुरू करण्यात आली असून, या प्रवासाठी गावाकऱ्यांनी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांचे आभार मानले.

याप्रसंगी गावकऱ्यांनी एस. टी. बस चालक व वाहकाचे शाल व श्रीफळ देऊन त्यांचे स्वागत केले.यावेळी माजी सरपंच ताराचंद सलामे, पोलीस पाटील धनराज सलामे, ग्राम पंचायत सदस्य मदन आलोकर, सीताराम कुमरे, किसना इनवाते, मगन उईके, उमेश आलोकर, संदीप सलामे, संपत इनवाते, मधुकर टेकाम, राजकिरण उईके, मनोहर कुमरे, यशवंत सलामे सह गावकरी प्रामुख्याने उपस्थित होते.

शिक्षक समितीचा एल्गार! २५ मागण्यांसाठी २९ ऑक्टोबरला सत्याग्रह व धरणे आंदोलन

मुख्य कार्यकारी अधिकारी झेनिथ दोंतुला यांना निवेदन, आठ दिवसांत सकारात्मक निर्णयाची अपेक्षा, एस-१४ वेतनश्रेणी, सुधारित एकस्तर पदोन्नती, निवडश्रेणी व चटोपाध्याय लाभांच्या प्रश्नांवर महत्त्वपूर्ण चर्चा; प्रशासनाच्या आश्वासनामुळे शिक्षकांच्या आशा पल्लवित!



दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

शिक्षकांच्या न्याय हक्कांसाठी आणि प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या गोंदिया जिल्हा शाखेने आंदोलनाची भूमिका अधिक तीव्र केली आहे. शिक्षकांच्या विविध २५ प्रलंबित मागण्यांसाठी येत्या २९ ऑक्टोबर रोजी सत्याग्रह व धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर समितीच्या शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी झेनिथ दोंतुला यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी सुमारे अर्धा तास विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत आठ दिवसांत मागण्यांबाबत निर्णयप्रक्रिया पुढे नेण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांना आता गती मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

एस-१४ वेतनश्रेणी व सुधारित एकस्तर पदोन्नतीचा प्रश्न ऐरणीवर!

शिक्षकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या एस-१४ वेतनश्रेणी आणि सुधारित एकस्तर पदोन्नतीच्या प्रश्नावर शिक्षक समितीने शासन निर्णयांचा आधार घेत ठोस भूमिका मांडली. २९ फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने २१ एप्रिल २०२६ रोजी निर्गमित आदेशावरील स्थगिती उठवून पात्र शिक्षकांना सुधारित एकस्तर पदोन्नतीचा लाभ २००२ पासून पूर्वलक्षी प्रभावाने देण्यात यावा, अशी आग्रही मागणी करण्यात आली.

सन २०२४ चा शासन निर्णय हा सन २००२ च्या शासन निर्णयाचा अन्वयार्थ स्पष्ट करणारा असल्याचे समितीच्या पदाधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिले. या संदर्भातील वस्तुस्थिती, नियम आणि विविध प्रशासकीय बाबी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमोर मांडण्यात आल्या.

या प्रश्नावर संबंधित शिक्षण विभागाने आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करावा, यासाठी निर्देश देण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका दर्शविल्याची माहिती समितीने दिली. त्यामुळे एस-१४ वेतनश्रेणी आणि सुधारित एकस्तर पदोन्नतीचा प्रश्न मार्गी लागण्याची शिक्षकांना अपेक्षा आहे.

निवडश्रेणी व चटोपाध्याय लाभांसाठी जोरदार पाठपुरावा

जिल्ह्यातील शिक्षकांची दीर्घकाळापासून प्रलंबित असलेली निवडश्रेणीची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यात यावीत, तसेच निवडश्रेणी व चटोपाध्याय वेतनश्रेणीचा लाभ मूळ रुजू दिनांकापासून देण्यात यावा, अशी मागणी समितीने केली.

या प्रश्नांवर संबंधित शासन निर्णयांचा संदर्भ देत नियमाधारित बाजू मांडण्यात आली. प्रलंबित प्रकरणांमुळे शिक्षकांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही व्हावी, यासाठी समितीने प्रशासनाचे लक्ष वेधले. या मागण्यांच्या अनुषंगाने सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन मिळाल्याचे समितीने स्पष्ट केले.

नवनियुक्त शिक्षकांच्या प्रश्नांनाही प्राधान्य

नवनियुक्त शिक्षकांच्या अडचणींकडेही समितीने प्रशासनाचे लक्ष वेधले. नव्याने नियुक्त झालेल्या शिक्षण सेवकांसाठी त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने वैद्यकीय शिबिर आयोजित करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच मार्च २०२७ मध्ये तीन वर्षांचा सेवाकाल पूर्ण करणाऱ्या नवनियुक्त शिक्षकांना नियमित सेवेत कायम करण्याच्या प्रक्रियेसाठी आवश्यक प्रस्ताव मागविण्यात यावेत, अशी मागणीही करण्यात आली. या विषयांवर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अनुकूलता दर्शवून आवश्यक पत्रव्यवहार करण्याचे संकेत दिल्याचे समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

२५ मागण्यांवर आंदोलनापूर्वी बैठक घेण्याची अपेक्षा

शिक्षक समितीने सादर केलेल्या निवेदनातील सर्व २५ मागण्यांवर आंदोलनापूर्वी बैठक आयोजित करून सविस्तर चर्चा व्हावी आणि प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी ठोस कार्यवाही करण्यात यावी, अशी भूमिका शिष्टमंडळाने मांडली. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी शिक्षकांच्या प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका घेत लवकरच शिष्टमंडळाला चर्चेसाठी आमंत्रित करून आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याचे समितीने सांगितले. मात्र, शिक्षकांचे प्रश्न केवळ आश्वासनांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष निर्णयांमधून सुटावेत, अशी अपेक्षा शिक्षकवर्गातून व्यक्त होत आहे. त्यामुळे २९ ऑक्टोबरपूर्वी प्रशासनाकडून कोणती ठोस पावले उचलली जातात आणि २५ मागण्यांवर काय निर्णय होतो, याकडे संपूर्ण जिल्ह्यातील शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

संघटित पाठपुराव्यातून शिक्षकांना न्याय मिळवून देण्याचा निर्धार

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने शासन आणि प्रशासनाकडे पाठपुरावा करीत आहे. विविध शासन निर्णयांच्या आधारे प्रलंबित प्रश्न मांडून त्यांची सोडवणूक करण्यासाठी समिती प्रयत्नशील आहे. आता २९ ऑक्टोबरच्या सत्याग्रह व धरणे आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाच्या पुढील भूमिकेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

शिष्टमंडळात पदाधिकाऱ्यांचा सहभाग

मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन सादर करताना महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष संदीप तिडके, विभागीय अध्यक्ष किशोर डोंगरवार, जिल्हा सरचिटणीस संदीप मेश्राम, उपाध्यक्ष होमराज बिसेन, कार्याध्यक्ष मुकेश रहांगडाले, तालुकाध्यक्ष सुशील रहांगडाले, संचालक राजेंद्र बोपचे, संचालक सतीश दमाहे, जिल्हा पदाधिकारी राज कडव, जिल्हा संघटक सी. बी. गोबाडे, नरेश मेश्राम, पी. सी. चचाने यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

आता लक्ष २९ ऑक्टोबरकडे!

२५ मागण्यांवर ठोस निर्णय होणार की शिक्षकांना सत्याग्रहाच्या मार्गाने संघर्ष करावा लागणार, याचे उत्तर आगामी प्रशासकीय कार्यवाहीतून स्पष्ट होणार आहे.

थोडक्यात

प्रख्यात रामनगरीत जय श्रीरामच्या जयघोषात पार पडला 'रावण वध' सोहळा

रावण वध सोहळ्याला नागरीकांची अलोट गर्दी, सोहळ्यादरम्यान चिमुकल्यांमधेही संचारला होता उत्साह, जोश



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

प्रभु श्रीरामाच्या पावन पदस्पर्शाने पावन झालेल्या या पवित्र रामनगरीत म्हणजेच रामटेक नगरीत ' रावण वध ' हा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. काल दि. २० ऑक्टोंबर मंगळवार ला शहराला लागुनच असलेल्या मानापुर येथील डिगी मैदानावर सदर सोहळ्याचे थाटात आयोजन तथा जय्यत अशी तयारी करण्यात आली होती.सोहळ्याला शहरासोबतच परीसरातील चिमुकल्यांपासुन मोठ्यांपर्यंत नागरीकांची अलोट गर्दी होती.

प्रभु श्रीरामाने रावणावर याच दिवशी विजय मिळवुन त्याचा वध केला होता. तो हाच विजयदशमीचा दिवस असुन या दिवशी प्रख्यात रामनगरीत 'रावण वध' हा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. प्रभू श्रीरामचंद्रांच्या जीवन काळाविषयी देशात जे महत्त्वपूर्ण स्थळे आहेत त्यांच्यापैकीच रामटेक हे एक अनन्यसाधारण महत्त्व असलेले स्थळ आहे. प्रभूंच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या रामनगरी रामटेक येथे दरवर्षी विजयादशमी दसरा हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. दरम्यान शहराला लागुनच असलेल्या मानापुर येथील डिगी मैदानावर रावण वध या सोहळ्याचे थाटात आयोजन करण्यात आले होते. दरवर्षीच्या सोहळ्याला राहाणारी नागरीकांची अलोट गर्दी विचारात घेता पोलीस प्रशाषणाने सुरक्षेच्या दृष्टीकोणातुन कडेकोट बंदोबस्त लावलेला होता. बायपास रस्त्यावर राखी तलावाशेजारी बॅरीकेट्स लावुन वर्धा वाहनांना डिगी मैदानाकडे जाण्यास मज्जाव करण्यात आलेला होता. त्याचप्रमाणे डिगी मैदानावर सुद्धा रावण तथा सुरपंक्षेचा प्रतिकात्मक पुतळे ठेवण्यात आलेल्या काही भागात कटघरा तयार करण्यात आलेला होता व त्याभोवती पोलीस तथा जवान तैनात करण्यात आलेले होते.

कटघऱ्याच्या आतमध्ये फक्त निवडक लोकांनाच प्रवेश देण्यात आलेला होता. याप्रसंगी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, रामटेक चे उपविभागीय अधिकारी (महसुल) प्रियेश महाजन, तहसीलदार रमेश कोळपे, रामटेकचे पोलीस निरीक्षक राजेश थोरात, नगराध्यक्ष बिकेंद्र महाजन, माजी सरपंच संदीप सावरकर, ज्योतीताई कोल्हेपरा हे प्रामुख्याने उपस्थित होते. दरम्यान गांधी चौक - डिगी मैदान मार्गानें काही तरुण मंडळींनी दानपट्टा व तलवारबाजी प्रस्तुत केली. दुपारी पाच वाजताच्या सुमारास श्रीराम गडमंदीरावरून तेथील पुजारीगण हे आपल्या इतर पुजारींसह गडावरील "निशान" घेऊन निघाले. वावेळी भोसला देवस्थान गडमंदीरचे निरीक्षक अधिकारी चंद्रशेखर बावनकर यांच्या सुरक्षा जवानांचा व पोलीस प्रशाषणाचा कडेकोट बंदोबस्त होता. दरम्यान साडेपाच वाजताच्या सुमारास गडमंदीरावरील पुजारी निशान घेऊन डिगी मैदानवर पोहोचले व जय श्रीराम चा जयघोष करीत रावणाचा पुतळ्याचा तथा सुरपंखेच्या प्रतिकात्मक पुतळ्याचा वध केला. यावेळी हजर असलेल्या हजारो नागरिकांनी एका सुरात 'जय श्रीराम'चा जयघोष केला, तेव्हा यावेळी संपुर्ण परीसर जय श्रीरामच्या जयघोषाने दुमदुमुन गेलेला होता. संपूर्ण देशात अयोध्या आणि रामटेक या प्रभू श्रीरामचंद्रांच्या जीवनलीलेशी संबंधित दोन ठिकाणी रावणाच्या पुतळ्याचे दहन न करता त्याचा वध केला जातो. या दृष्टीने रामटेक येथील दसरा उत्सव विशेष ठरतो.

नगरधन येथे दसरा महोत्सव उत्साहात संपन्न

समाजात एकोपा, बंधुभाव सदभावना टिकवून ठेवा : चंद्रपाल चौकसे, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

विजयादशमीच्या पावन पर्वावर रामटेक तालुक्यातील मौजा नगरधन येथे बजरंग दल नगरधनच्यावतीने २० ऑक्टोबर रोज मंगळवारला भव्य रावण दहन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) चे प्रदेश उपाध्यक्ष तथा पर्यटक मित्र चंद्रपालजी चौकसे साहेब यांनी उपस्थित राहून उपस्थित सर्व नागरिकांना विजयादशमीच्या शुभेच्छा देत संबोधित केले. विजयादशमी हा सण सत्याचा असत्यावर आणि चांगुलपणाचा वाईट प्रवृत्तींवर विजय मिळवण्याचा संदेश देतो. प्रभू श्रीराम यांच्या आदर्शांचे स्मरण करून समाजात एकता, बंधुभाव आणि सद्भावना कायम राखण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

नगरधन येथे आयोजित या भव्य रावण दहन कार्यक्रमाला ग्रामस्थ आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाला भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष उदयसिंग (गज्जू) यादव, माजी सभापती नरेंद्र बंधाटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष राजू राऊत, माजी जिल्हा परिषद सदस्य दुधराम सव्वालाखे, भाजपचे जिल्हा महामंत्री राहुल किरपान, खैरी-बीजेवाडा येथील सरपंच रणवीर यादव, नगरधनच्या सरपंच माया दमाहे, उपसरपंच श्रीराम धोपटे,माझी सरपंच प्रशांत कामडी, माझी पं.स. सदस्य शंकर होलगिरे, सदाराम गाते, राजेश जयस्वाल, पिंटू नंदनवार, आनंद रामेलवार आणि भूषण कडूकर बजरंग दल नगरधनचे अध्यक्ष पिंटू अजबैले, अशोक गंगाबोर, अनिल मुटकुरे, गंगा गंगाबोर, दुलीचंद आंबेकर, सुरेंद्र माहुले, नानू माहुले, मुनेश्वर माहुले, रवींद्र वंजारी आणि लहानूजी लिल्हारे यांच्यासह बजरंग दल नगरधनचे सर्व सदस्य, ग्रामस्थ व नागरिक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

'सन्मान सौदामिनीचा': महावितरणकडून महिला कर्मचाऱ्यांच्या कर्तृत्वाचा यथोचित गौरव!





दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

वीज वितरणासारख्या अत्यंत आव्हानात्मक आणि अत्यावश्यक सेवेत कार्यरत असताना, नोकरीची जबाबदारी आणि कुटुंबाचा सांभाळ असे दुहेरी आव्हान महिला कर्मचारी लीलया पेलत असतात. या कठीण वाटचालीत नागपूर शहरातील महावितरणच्या महिला कर्मचाऱ्यांनी केवळ उत्कृष्ट कार्यालयीन सेवाच दिली नाही, तर कला, क्रीडा, साहित्य आणि सामाजिक अशा विविध क्षेत्रांतही आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. या सर्व कर्तृत्ववान महिलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या प्रेरणादायी कार्याचा सन्मान करण्यासाठी महावितरणच्या नागपूर शहर मंडळातर्फे विविध कार्यालयांमध्ये सन्मान सौदामिनीचा या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून महावितरणच्या सिव्हिल लाईन्स, महाल, गांधीबाग, कॉंग्रेसनगर आणि बुटीबोरी या प्रमुख विभागांमध्ये हा उपक्रम पार पडला. सिव्हिल लाईन्स विभागात झालेल्या कार्यक्रमात बोलताना नागपूर शहर मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रफुल लांडे म्हणाले की, कौटुंबिक व व्यावसायिक जबाबदाऱ्यांचा सुरेख समतोल साधत महावितरणच्या महिला अधिकारी व कर्मचारी ज्या निष्ठेने सेवा देत आहेत, त्याचा प्रशासनाला सार्थ अभिमान आहे. या प्रसंगी सिव्हिल लाईन्स विभागाचे कार्यकारी अभियंता धम्मदीप फुलझाले, शहर चाचणी विभागाचे कार्यकारी अभियंता चंदन तल्लरवार, कार्यकारी अभियंता (प्रशासन) प्रीती फुले यांच्यासह सर्व विभागप्रमुख आणि महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विविध विभागांमध्ये पार पडलेल्या या सोहळ्यात उपस्थितांनी महिलांच्या योगदानाचे मुक्तकंठाने कौतुक केले. महाल विभागात कार्यकारी अभियंता डॉ. गजानन जयस्वाल यांनी, महिलांनी आपल्या स्व-अनुभवातून प्रेरणा घेत समाजकार्यासाठी स्त्रीशक्तीचा सकारात्मक वापर करण्याचे आवाहन केले. तर बुटीबोरी विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत टेंभेकर यांनी, पारंपरिक चौकटींना बाजूला सारत महावितरणच्या महिला कर्मचाऱ्यांनी वीज क्षेत्रातील तांत्रिक व आव्हानात्मक कामांमध्येही स्वत:ला उत्तमरीत्या सिद्ध केल्याचे सांगितले. गांधीबाग विभागाचे कार्यकारी अभियंता संतोष क्षीरसागर यांनी महिला शक्तीला वंदन करत त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. याशिवाय, कॉंग्रेसनगर विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल जीवतोडे यांनी, रोजच्या धावपळीच्या जीवनशैलीत महिलांनी स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष देण्यासोबतच आपले छंद जोपासण्यासाठीही आवर्जून वेळ काढला पाहिजे, असा मोलाचा सल्ला दिला.

या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे महावितरणमधील महिला कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले असून, त्यांच्या या बहुमुखी प्रतिभेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

'सप्तर्षी' पुरस्कार वितरण सोहळा २५ ऑक्टोबरला

हिंदू रिसर्च फाउंडेशनतर्फे साहित्य, कला आणि विज्ञान क्षेत्रातील सात मान्यवरांचा गौरव

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

हिंदू रिसर्च फाउंडेशन, मुंबई-नागपूरच्या वतीने आयोजित प्रतिष्ठेचा 'सप्तर्षी' पुरस्कार वितरण सोहळा रविवार, २५ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता पर्सिस्टंट सिस्टिम्स, आयटी पार्क, नागपूर येथील कविकुलगुरू कालिदास सभागृहात होणार आहे. वंदा या पुरस्कारांचे पाचवे वर्ष असून, साहित्य, कला आणि विज्ञान क्षेत्रातील सात मान्यवरांना सन्मानित करण्यात येणार आहे.

महर्षी वाल्मिकी, नागार्जुन, आचार्य भारद्वाज, आचार्य कणाद, देवशिल्पी विश्वकर्मा, आर्यभट्ट आणि आचार्य सुश्रुत या प्राचीन भारतीय ऋषींच्या नावाने हे पुरस्कार प्रदान केले जातात. प्रत्येक पुरस्काराचे स्वरूप एक लाख रुपये रोख आणि सन्मानपत्र असे आहे.

'रिव्हिजिटिंग द ग्लोरियस पास्ट ऑफ भारतवर्ष' या संकल्पनेवर आधारित या सोहळ्याला नवी दिल्ली येथील केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. श्रीनिवास वरखेडी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. सुरत येथील जीवदया फाउंडेशनचे किशोरभाई शाह सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. जामनगर येथील जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) ग्लोबल ट्रेडिशनल मेडिसिन रिसर्च सेंटरमधील डेटा अँड इनोव्हेशन विभागाच्या युनिट प्रमुख डॉ. गीता कृष्णन जी. पिल्लई या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील.

या सोहळ्याला प्रवेश विनामूल्य असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

'सप्तर्षी' पुरस्कारांचे मानकरी

- महर्षी वाल्मिकी पुरस्कार - पद्मश्री भालचंद्र वि. नेमाडे: प्रख्यात मराठी साहित्यिक, कादंबरीकार, कवी, समीक्षक आणि विद्वान.
- आर्यभट्ट पुरस्कार - पद्मश्री प्रा. व्ही. कामकोटी वीज्ञानाथनः प्रख्यात संगणकशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि आयआयटी मद्रासचे संचालक.
- नागार्जुन पुरस्कार - पद्मश्री प्रा. थलप्पिल प्रदीपः प्रख्यात भारतीय शास्त्रज्ञ आणि आयआयटी मद्रासमधील प्राध्यापक.
- विश्वकर्मा पुरस्कार - डॉ. अनिल रामजी सुतारः प्रख्यात भारतीय वास्तुविशारद आणि शिल्पकार. 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'च्या निर्मितीतील योगदानासाठी ते प्रसिद्ध आहेत.
- आचार्य भारद्वाज पुरस्कार - सुयश सिंहः गॅलेक्सआय स्पेस सोल्यूशन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सहसंस्थापक.
- आचार्य सुश्रुत पुरस्कार - डॉ. वेदप्रकाश मिश्राः दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्चचे प्रो-चॅन्सेलर.
- आचार्य कणाद पुरस्कार - प्रा. संजय जे. ढोबळेः भौतिकशास्त्राचे प्रख्यात प्राध्यापक.

रामटेकमध्ये जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड, १० जणांना पकडले

सोनेघाट शेतशिवारात कारवाई, ७ हजार ९० रुपये आणि ५२ ताशपत्ते जप्त



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

रामटेक पोलीस स्टेशन हद्दीतील सोनेघाट शेतशिवारात ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या दहा जणांना रामटेक पोलिसांनी पकडले. दिनांक १८ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत पोलिसांनी रोख ७ हजार ९० रुपये आणि ५२ ताशपत्ते असा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दहाही जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनेघाट शेतशिवारात काही इसम ताशपत्त्यांचा जुगार खेळत असल्याची खात्रीशीर माहिती गुप्त बातमीदारामार्फत रामटेक पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी घटनास्थळी धाड टाकली असता, काही जण जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत दहा जणांना पकडले. या कारवाईत चंद्रशेखर चिंतामण राऊत (वय २१, रा. चौधान), फिरोज करीम कुरेशी (वय २८, रा. आझाद वार्ड) तसेच अशोक बालकृष्ण उईके (वय ३०), नितेश वासुदेव उईके (वय ३१), आकाश सुखदास धुर्वे (वय २८), प्रविण भगवान उईके (वय २३), आर्यन बबलू मडावी (वय २१), समीर प्रकाश इनवाते (वय २२), योगेश सुनील उके (वय १९) आणि रोहित रमेश कोडवते (वय २०), सर्व रा. सोनेघाट, ता. रामटेक, जि. नागपूर, यांचा समावेश आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून ५२ ताशपत्ते आणि रोख ७ हजार ९० रुपये असा एकूण ७ हजार ९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी रामटेक पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

तुमसर येथील नेहरू क्रीडांगणात दशहरा उत्सव उत्साहात संपन्न

दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर : तुमसर येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा विजयादशमीच्या पर्वावर नेहरू क्रीडांगणावर दशहरा उत्सव अत्यंत उत्साहात व दणक्यात साजरा करण्यात आला. नेहरू ग्राउंड तुमसर येथे विविध पक्षाकडून व सामाजिक संघटना कडून आपापल्या पेंडॉलमधून



उपस्थित जनसमुदायाला आपट्याचे पान देऊन विजयादशमीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. या भव्य सोहळ्यात विविध राजनैतिक पक्ष व सामाजिक संघटनांतर्फे शुभेच्छा देण्यासाठी आकर्षक पेंडल उभारण्यात आले होते, जिथे उपस्थित अनेक मान्यवर व नेतेमंडळींनी नागरिकांशी संवाद साधत सणाचा उत्साह द्विगुणित केला. बावडी मंदिरातील दुर्गा देवीची विसर्जन मिरवणूक नेहरू क्रीडांगणावर आगमन झाल्यावर पारंपरिक पद्धतीने आणि मोठ्या उत्साहात रावण दहन करण्यात आले\ ज्यानंतर लक्षवेधी व भव्य आतिषबाजीने संपूर्ण परिसर उजळून निघाला. या आनंददायी वातावरणात जनसामान्यांनी एकमेकांना आपट्याची पाने व सोन्यासारख्या सदिच्छा देऊन दसऱ्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आणि या ऐतिहासिक व पारंपरिक पर्वाचा सोहळा संस्मरणीय केला. श्रीराम नवमी उत्सव समिती, रावण दहन समिती, तुमसरकडून उपस्थित सर्व नागरिकांचे आभार व्यक्त करण्यात आले.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे उच्चांकी वीजमागणीत दिलासा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

एल निनोच्या प्रभावामुळे पाऊस कमी झाल्याचा परिणाम म्हणून ऑक्टोबर महिन्यात अभूतपूर्व उष्णता जाणवत आहे. मुंबईसह राज्यात १० ऑक्टोबर रोजी आतापर्यंतची सर्वाधिक ३८,०२१ मेगावॅट विजेची मागणी नोंदविली गेली असून उच्चदाब वीज प्रणालीतून ३२,९२१ मेगावॅट आणि मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या अंतर्गत सौर प्रकल्प व प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या माध्यमातून ५१०० मेगावॅट वीज उपलब्ध झाल्याने उच्चांकी वीज मागणी पूर्ण करण्यात आली. सौर ऊर्जा योजनांमुळे दिवसा वीज उपलब्ध होण्यासोबत वीजखरेदीतील बचतीचा लाभ होत आहे.

मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले की, दुष्काळी परिस्थितीत राज्यात उन्हाच्या झळा जाणवत आहेत. विजेची मागणी प्रचंड वाढली असताना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेऊन सुरू केलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजनेचा मोठा लाभ झाला आहे. त्यासोबत प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून राज्यात छतांवर उभारलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पांचाही लाभ झाला आहे. या योजनांमुळे दिवसा वीज मागणी वाढलेली असताना विजेची उपलब्धता आणि वीज खरेदीतील मोठी बचत असा दुहेरी दिलासा मिळाला आहे.

राज्यातील सर्व ४८ लाख कृषी पंप सौर ऊर्जेवर चालविण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत एकूण १६,००० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. आतापर्यंत सात हजार मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. सध्या या योजनेमुळे व काही तांत्रिक उपायांचा अवलंब करून ८० टक्के कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे १० ऑक्टोबर या उच्चांकी मागणीच्या दिवशी सर्वाधिक ५५०० मेगावॅट वीज पुरवठा दुपारी बारा वाजताच्या सुमारास झाला. सौरऊर्जा प्रकल्पात सूर्यप्रकाशाच्या उपलब्धतेनुसार वीजनिर्मिती बदलत असते. त्यातून होणाऱ्या वीजनिर्मितीमुळे दिवसा वीजमागणी मोठ्या प्रमाणावर असताना राज्याला दिलासा मिळत आहे.

मुंबईसह राज्यात विजेच्या ग्रीडमधील मागणीनुसार दि. १० ऑक्टोबर रोजी उच्चांकी मागणीची ३२,९२१ मेगावॅट इतकी नोंद झाली. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत विकेंद्रित स्वरुपाचे सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प उभे करून स्थानिक उपकेंद्रांना वीज पुरविली जाते. परिणामी त्याद्वारे निर्माण झालेल्या विजेची नोंद राज्याच्या ग्रीडमधील मागणीमध्ये समाविष्ट होत नाही. त्याच प्रकारे प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतही स्थानिक पातळीवर वीज तयार करून घरात वापरली जाते, त्यामुळे ग्रीडमधील विजेच्या मागणीमध्ये त्याची नोंद होत नाही. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेद्वारे व प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेमुळे उपलब्ध वीज ध्यानात घेता १० ऑक्टोबर रोजी राज्यात प्रत्यक्षात एकूण ३८,०२१ मेगावॅट वीज मागणी होती, असे स्पष्ट होते. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेसह विविध योजनांमध्ये राज्यात सुमारे ११ लाख वीज ग्राहकांनी छतावर बसविलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पांची एकूण क्षमता ७,१७५ मेगावॅट झाली आहे.

या दोन योजना अंमलात आल्या नसत्या तर थेट राज्याच्या ग्रीडवर मोठा विजेचा भार येऊन मोठी समस्या निर्माण झाली असती. सध्या अनेक राज्यांमध्ये विजेच्या टंचाईमुळे निर्माण झालेली परिस्थिती हाताळताना अडचणी येत आहेत. तथापि, महाराष्ट्र राज्यात सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे विजेची मागणी पूर्ण करण्यात मदत होत आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे तिहेरी लाभ

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे दिवसभरात मोठ्या प्रमाणात वीज उपलब्ध झाल्यामुळे शेतीसाठी रात्रीच्या ऐवजी दिवसा वीज पुरवठा करण्यात येत आहे. या योजनेत सरासरी ३ रुपये ९ पैसे प्रती युनिट इतक्या कमी दराने वीज उपलब्ध होत असल्याने रात्रीची महाग वीज विकत घ्यावी लागत नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वीजखरेदीत बचत होत आहे. सप्टेंबर महिन्यात या योजनेतून ८७८ दशलक्ष युनिट वीज उपलब्ध झाली. रात्रीचा शेतीपंपाचा २५०० मेगावॅट इतका भार दिवसा वळविल्यामुळे कमाल वीजदराच्या तुलनेत वीजखरेदीचे ३८४ कोटी रुपये वाचले. या योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा, वीज पुरवठा व्यवस्थापनाला मोलाची मदत आणि वीजखरेदीचा पैशाची बचत असा तिहेरी लाभ होत आहे.

थोडक्यात

डॉ. मनोहरांनी भाषा सौंदर्याचा मानदंड स्थापित केला : प्रमोद वाळके

'चौथे पिटक' आणि 'व्याख्यांतर' पुस्तकाचे प्रकाशन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

डॉ. मनोहर यांची भाषा, भाषणे, कविता, लेखन उच्च दर्जाचे आहे. त्यांनी कायम उदात्त मानवी मूल्यांसाठी आपली वाणी आणि लेखणी झिजविली आहे. त्यांच्या साहित्याचा तुलनात्मक अभ्यास झाला पाहिजे. मनोहर यांनी भाषा सौंदर्याचा सर्वोच्च मानदंड स्थापन केला असल्याचे प्रतिपादन प्रमोद वाळके यांनी केले. ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत आणि साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर यांच्या 'चौथे पिटक' आणि 'व्याख्यांतर' या दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा रविवारी (ता.१८) त्यांच्या लुंबिनी या निवासस्थानी ज्येष्ठ आंबेडकरी गझलकार प्रमोद वाळके युगंधर यांच्या हस्ते पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जेष्ठ संपादक श्रीमंत माने होते तर विशेष अतिथी म्हणून सकाळच्या विदर्भ आवृत्तीचे निवासी संपादक प्रमोद काळबांडे व मनोविकास प्रकाशनचे प्रकाशक आशिष पाटकर प्रामुख्याने उपस्थित होते. या दोन्ही पुस्तकांवर डॉ. शैलेंद्र लेंडे आणि डॉ. अनमोल शेंडे यांनी भाष्य केले. पुस्तकावर भाष्य करताना डॉ. शैलेंद्र लेंडे म्हणाले,महाकथनांच्या अंताच्या काळात बौद्ध आंबेडकरी दृष्टिकोनातून भारतीय समाजातील प्रश्नांचा वेध घेत, समताधिष्ठित पर्यायांची मांडणी करणारे इहविज्ञाननिष्ठ आणि सर्वमानव समतेचा उद् घोष करणारे अनोखे महाकथन या पुस्तकातून डॉ. यशवंत मनोहर यांनी साकारले.



प्राचीन साहित्यातील पात्रांच्या विचारांवर आधारित नोबेल पुरस्काराचे निकष लावले तर डॉ. मनोहर यांची पुस्तके नोबेल पेक्षाही कैक पटीने श्रेष्ठ ठरतील, असा विश्वास प्रमोद काळबांडे यांनी व्यक्त केला. तर श्रीमंत माने यांनी विचार, लेखन आणि कृतीतून स्पष्ट आणि टोकदार भूमिका मांडणाऱ्या डॉ. मनोहर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव केला. प्रस्ताविक प्रकाश राठोड यांनी तर सूत्रसंचालन प्रशांत वंजारे यांनी केले. ज्योतिक ढाले यांनी आभार मानले. यावेळी गौतमीपुत्र कांबळे, अशोक नारनवरे, मनोहर नाईक, प्रमोद नारायणे, सुधीर भगत, करण सातपुते, सर्जनादित्य मनोहर यांच्याबरोबरच साहित्यक्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

देशात अस्वस्थता असली तरी अभिजीत दिपके आणि नेहा बोरा यांच्यासारखी तरुण मुले देशाला उदास होऊ देणार नाहीत. त्यांच्या स्वप्नांच्या आणि परिवर्तनाच्या प्रवाहासोबत आपण उभे राहायला हवे. भांडवलशाहीने शोषणाच्या बळावर, तर ब्राह्मण शाहीने फसवणुकीच्या प्रभावी भाषेतून सामान्यांचे महाकथन गिळंकृत केले आहे. मात्र, मी या अगतिक माणसांचे महाकथन करीत राहील. अशी स्पष्ट भूमिका लेखक यशवंत मनोहरांनी मांडली.

खात येथे विजयादशमी निमित्त भव्य रावण दहन कार्यक्रम



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

विजया दशमीच्या पर्वावर 'खात नवयुवक रावण दहन समिती'च्या वतीने एका भव्य रावण दहन कार्यक्रमाचे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या ऐतिहासिक सोहळ्यात लहान मुलांनी साकारलेली सुंदर वेशभूषा आणि सादरीकरण, मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व सत्कार सोहळा,परिसरातील हजारो नागरिकांनी उपस्थिती कार्यक्रमाचे आकर्षणाचे केंद्र ठरले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य राधा मुकेश अग्रवाल, माजी सरपंच नीलकंठ गिरीपुंजे, सरपंच खात माधुरी कैलास वैद्य, माजी तालुकाध्यक्ष भाजपा, माजी पंचायत समिती सदस्य मुकेश अग्रवाल, उपसरपंच खात रवींद्र मांडरकर,कैलास वैद्य माजी सरपंच कैलास वैद्य, माजी उपसरपंच शंकर वैद्य, अध्यक्ष भाजपा खात गुड्डू गिरीपुंजे, ग्रामपंचायत सदस्यगण पुरुषोत्तम शर्मा, अरविंद तांबूलकर, शैलेश गिरीपुंजे, कांचन देवतारे, निर्मला मेंढे,बबीता खोब्रागडे, रंगनाथ खराबे, मंगेश आंबीलदुढे,रविन्द्र लेदे, सचिन समरीत,अशोक दळणे,सचिन वाहणे,उमेश वैद्य, युवराज गिरीपुंजे, मोरेश्वर वैद्य, नीलकंठ दिघोरे तसेच गाव व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन करून दसऱ्या निमित्य सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

देवमुंढरी येथील भवानी माता मंदिरात माजी आमदार टेकचंद सावरकर यांनी सपत्नीक घेतले मातेचे दर्शन



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

टेकचंद सावरकर माजी आमदार कामठी विधानसभा व त्यांच्या पत्नी निशा ते टेकचंद सावरकर माजी अध्यक्षा जिल्हा परिषद नागपुर यांनी देवमुंढरी येथील भवानी माता मंदिर येथे मातेचे दर्शन घेतले व उपस्थित भाविक भक्तान्ना शुभेच्छा दिल्या. यावेळी भगवान बावनकुळे अध्यक्ष भाजपा तालुका मौदा मंडळ, चंद्रशेखर जाधव अध्यक्ष भाजपा अ.जा. मौदा तालुका, गोपाल गिरमेकर उपसरपंच कोदामेंढी, रोशन उमप सदस्य संजय गांधी निराधार योजना समिती मौदा, मंदिर कमिटी पदाधिकारी व इतर भक्तगण उपस्थित होते.

घुग्घुस नगर परिषदेतील ७.०९ कोटींचा गैरप्रकार उघड, कारवाईची मागणी

तलावाऐवजी डब्ल्यूसीएलच्या जमिनीवर अमृत योजनेचा निधी खर्च करण्याचा प्रस्ताव

दै. सिंहवाणी वृत्त, घुग्घुस

घुग्घुस नगर परिषदेच्या अमृत योजनेतील ७.०९ कोटी रुपयांचा घोटाळा उघड केल्याचा दावा दोन तक्रारदारांनी केला आहे. तलावाच्या पुनरुज्जीवनासाठी मंजूर झालेला निधी प्रत्यक्ष तलावावर खर्च करण्याऐवजी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडच्या पडीत जमिनीवर खर्च करण्याचा घाट नगर परिषदेने घातल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

ज्येष्ठ पत्रकार अंजन्या अनपर्थी आणि सामाजिक कार्यकर्ते इबादुल सिद्दिकी यांनी पर्यावरण विभाग, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी दाखल केल्या आहेत. प्रत्यक्ष तलावाऐवजी डब्ल्यूसीएलच्या जमिनीवर अमृत योजनेचे ७.०९ कोटी रुपये खर्च करण्यासाठी काढलेल्या निविदेची आर्थिक बोली उघडू नये आणि ही निविदा रद्द करावी, असे निर्देश घुग्घुस नगर परिषदेला देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

तक्रारीसोबत सातबारा उतारे आणि इतर संबंधित कागदपत्रे जोडण्यात आली आहेत. या कागदपत्रांनुसार, घुग्घुसमधील मूळ तलाव मशिदीच्या मागे असून, त्याचा सर्व्हे क्रमांक १०/१ आहे. या सर्व्हे क्रमांकाच्या सातबारा उताऱ्यावर शासनाने तलावाची स्पष्ट नोंद केली असून, नागरिक व गुरांचे निस्तार हक्कही कायम ठेवले आहेत.

जिल्हा प्रशासनामार्फत या तलावाचे सक्षीचे भूसंपादन करून त्याच्या पुनरुज्जीवनावर अमृत योजनेचा निधी खर्च करावा, अशी दोन्ही तक्रारदारांची मागणी आहे. तलावातील पाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पिण्याव्यतिरिक्त इतर कामांसाठी वापर करता येईल. तसेच मासेमारी, गुरांसाठी पाणी, शिंगाड्यांची लागवड, धार्मिक उपक्रम आणि मनोरंजन आदींसाठी हा तलाव संपूर्ण घुग्घुसवासीयांना उपयुक्त ठरेल, असे त्यांनी म्हटले आहे.

मात्र, घुग्घुस नगर परिषदेने सामाजिक कार्यकर्ते इबादुल सिद्दिकी यांच्या घरामागे असलेल्या डब्ल्यूसीएलच्या जमिनीवर कामे प्रस्तावित केली आहेत. या जमिनीचा सर्व्हे क्रमांक ३२२ आहे. सातबारा उताऱ्यानुसार, या जमिनीची मालकी डब्ल्यूसीएलकडे असून, वापराबाबत बळीराजा शेत आणि पांदण रस्ता अशी नोंद आहे. दीक्षित तलावाच्या सातबारा उताऱ्यावर तलावाची स्पष्ट नोंद असताना, या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर तलावाचा कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे ही जागा तलाव नसून सांडपाणी साचलेला खड्डा असल्याचे स्पष्ट होते, असा दावा तक्रारदारांनी केला आहे.

या जमिनीवर साचलेले पाणी आणि अस्वच्छतेसाठी डब्ल्यूसीएलला जबाबदार धरले पाहिजे, असेही त्यांनी म्हटले आहे. डब्ल्यूसीएलने आपल्या सीएसआर निधीतून स्वतःच्या जमिनीची स्वच्छता राखावी, असे निर्देश नगर परिषदेने कंपनीला द्यावेत, अशी त्यांची मागणी आहे. सातबारा उताऱ्यानुसार, या जमिनीवर घुग्घुसमधील नागरिक व गुरांचे कोणतेही हक्क नोंदवलेले नाहीत. त्यामुळे प्रत्यक्ष तलावाऐवजी डब्ल्यूसीएलच्या जमिनीवर केंद्र शासन, राज्य शासन आणि घुग्घुस नगर परिषदेचा निधी खर्च करणे हा घोटाळा असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. सार्वजनिक पैशाची लूट करण्यासाठी नगर परिषद आणि काही कंत्राटदारांमध्ये संगनमत असल्याचा आरोपही दोन्ही तक्रारदारांनी केला आहे.

नगरसेवकांच्या आक्षेपांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप!

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती आणि निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी आवश्यक सर्वसाधारण सभेच्या मान्यता घेण्यात आल्या नसल्याचा आरोप निवेदनात आहे. प्रकल्पाचा आराखडा, तलाव निवडीचा आधार, जमीन उपलब्धता, खर्चाचे विवरण आणि निविदेच्या अटी नगरसेवकांसमोर ठेवण्यात आल्या नसल्याचेही म्हटले आहे. निविदा सादर करण्याची मुदत संपण्याच्या अवघ्या दोन दिवस आधी, २३ सप्टेंबर २०२६ रोजी दोन नगरसेवकांना प्रक्रियेची माहिती मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यानंतर काही नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन निविदा रद्द करण्याची व त्यापक चर्चा करून सुधारित प्रस्ताव तयार करण्याची मागणी केली. मात्र, आक्षेपांचे समाधान न करता प्रक्रिया पुढे सुरू ठेवण्यात आल्याचा आरोप आहे.

कार्यादेशाची मुदत आणि आचारसंहितेवरही आक्षेप!

संबंधित शासन निर्णयानुसार ४५ दिवसांत कार्यादेश देणे अपेक्षित असताना तो देण्यात आला नसल्याचा दावा निवेदनात आहे. निर्धारित मुदत संपल्यानंतर नगरविकास विभागाची मुदतवाढ किंवा आवश्यक मान्यता घेतली का, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

कार्यादेशानंतर १२ महिन्यांत काम पूर्ण करण्याची अट असल्याचे नमूद करून, निविदा सूचनेतील कामाच्या कालावधीच्या रकान्यात नॉट अव्हेलेबल असा उल्लेख असल्यावर आक्षेप घेण्यात आला आहे. स्पष्ट कालमर्यादा नसल्याने विलंबाबाबत कंत्राटदाराची जबाबदारी निश्चित करण्यात अडचणी येऊ शकतात, असे निवेदनात म्हटले आहे.

पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू असताना तांत्रिक निविदा उघडण्यात आल्याचाही आरोप आहे.

दोन्ही सहभागी आस्थापनांच्या पात्रतेवर प्रश्न!

निविदेत मे. साबुरी कन्स्ट्रक्शन कंपनी आणि मे. परवेश सुभान शेख या दोन आस्थापनांनी सहभाग घेतल्याचे निवेदनात नमूद आहे. नगरपरिषदेच्या तांत्रिक मूल्यांकन अहवालाचा दाखला देत दोन्ही आस्थापनांकडे निविदेत अपेक्षित अनुभव नसल्याचा दावा करण्यात आला आहे. असे असतानाही आर्थिक निविदा उघडून साबुरी कन्स्ट्रक्शन कंपनीला कंत्राट देण्याची तयारी सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

केवळ एका कंत्राटदाराच्या फायद्यासाठी निविदा!

निविदेतील अटी व शर्ती अमृत योजनेतील अटी व शर्तींपेक्षा वेगळ्या असून, विशिष्ट कंत्राटदाराला फायदा मिळवून देण्यासाठी हा बदल करण्यात आल्याचा आरोपही दोन्ही तक्रारदारांनी केला आहे. संपूर्ण निविदा प्रक्रियेची सखोल चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

प्रत्येक विकासकामात लोकसहभाग आवश्यक!

कोणतीही योजना किंवा विकासकाम यशस्वी होण्यासाठी लोकसहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे. घुग्घुस नगर परिषदेने जाहीर सूचना प्रसिद्ध करून नागरिकांच्या सूचना व हरकती मागविणे किंवा संबंधित घटकांची बैठक घेणे बंधनकारक होते. त्यामुळे नव्याने निविदा प्रसिद्ध करण्यापूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच नगर परिषदेच्या सर्व योजना व विकासकामांमध्ये लोकसहभाग सुनिश्चित करावा, अशी मागणीही त्यांनी केली.

विजयादशमी निमित्त रावण दहणाचा कार्यक्रम राजीव गांधी पार्क गणेशनगर, नागपूर येथे उत्साहात

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर





गेल्या २३ वर्षांपासून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रावण दहणाचा कार्यक्रम राजीव गांधी पार्क, गणेशनगर,नागपूर येथे नवज्योत क्रीडा मंडळ व आयोजक प्रशांत धवड मित्र परिवारा तर्फे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी मान्यवरांचे विजयादशमी निमित्त सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुरसंचलन पत्रकार रमेश लांजेवार यांनी केले. विजयादशमी निमित्त कार्यक्रमाचे अध्यक्ष संजयजी महाकाळकर (नागपूर महानगरपालिका विरोधी पक्ष नेते) हे होते. व प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक अतुल कोटेचा, अतुल लोढे काँग्रेस प्रदेश प्रवक्ता यांच्यासह अनेक मान्यवरांनी विजयादशमीच्या शुभ पर्वावर आपले मनोगत व्यक्त केले.

यामध्ये आयोजक प्रशांतजी धवड, अशोकजी दलाल, डॉ. उत्तमराव तुरणकर,राजुभाऊ खोपडे,एकनाथ काळमेघ यांनी या निमित्ताने आपली प्रखर भुमिका मांडली. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीमध्ये मुरमे गुरूजी, शिरीष लहूा, रघुविरसिंग ठाकुर, लक्ष्मीकांत ठाकरे, योगेश बावनकर, विलास गावंडे, जनार्दन चरडे, छोटूभाऊ गुरव, प्रविण भोयर, फोटोग्राफर विलास घोराडकर, प्रमोद काकडे, अनिलजी तिवारी, सुवर्णाताई भोयर, अर्चना गोल्हर, अंजली ठाकरे, जसपाल जाधव, शुभम रणदिवे, श्रीकांत धांडे सह अनेक मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी सय्यदभाई डेकोरेशन वाले यांनी गणेशनगर परिसर रोशनाईच्या माध्यमातून तिरंगामय भव्य सजावट करून सर्वांना आकर्षित केले व कारवटकर याचा भव्य फटकाशोमुळे संपूर्ण परिसर आनंदमय झाला. त्यानंतर रावण दहन करण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमाचा आनंद परिसरातील संपूर्ण नागरिकांनी मोठ्या उत्साहाने घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन एकनाथजी काळमेघ यांनी केले.


दीक्षाभूमी परिसरातून १४४ टन कचऱ्याची उचल

मनपाच्या सफाई कर्मचाऱ्यांनी केले अहोरात्र काम, ५८ हजार अनुयायांनी घेतली आपली बसची सेवा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या सफाई कर्मचाऱ्यांनी अहोरात्र काम करून परिसर स्वच्छ ठेवण्याचे काम केले. घनकचरा व्यवस्थापन विभागाने दीक्षाभूमी परिसरातून तीन दिवसात एकूण १४४ टन कचऱ्याची उचल केली. याशिवाय अंबाझरी, बेझनबाग व उंटखाना या परिसराची स्वच्छता करण्यात या सफाई कर्मचाऱ्यांनी मोलाची कामगिरी केली. यासाठी तीन पाळ्यांमध्ये ८७२ सफाई कर्मचारी, २३४ कचरा संकलक, ३ सक्शन मशीन, ३ चोकेज मशीन, १९० कचरा कुंड्या, कचरा वाहून नेण्यासाठी १०८ गाड्यांचा वापर करण्यात आला. भांडेवाडीमध्ये कचवार्ची विल्हेवाट लावण्यासाठी ४ कॉम्प्रॅक्टरचा वापर करण्यात आला. यामुळे लाखो अनुयायांचे आगमन झाल्यानंतरही शहराची स्वच्छता राखण्यास मनपा प्रशासन यशस्वी झाले आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूर महानगरपालिकेने नागरी सुविधा, स्वच्छता व वाहतुकीची जबाबदारी पार पडली. गेल्या १८ ऑक्टोबरपासून मनपाचे कर्मचारी २४ तास कामावर लागले होते.

सम्राट अशोक विजयादशमीला बुद्ध पार्कमध्ये जनसागर, २००० वर्षांचा धम्माचा इतिहास एकाच छताखाली



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

बिहारमधील बोधगयेच्या महाबोधी महाविहाराची ५६ फुटी भव्य प्रतिकृती नागपूरकरांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरली आहे. नागपूर बुद्धिस्ट कॉन्सोर्टियमतर्फे बुद्ध पार्क, बुद्ध नगर येथे आयोजित महाबोधी टेम्पल वर्ल्ड हेरिटेज एक्स्पो २०२६ मध्ये नागरिकांना बोधगयेचे दर्शन नागपुरातच घडत आहे. प्रतिकृती पाहून अनेक नागरिक भावूक झाले. सम्राट अशोक विजयादशमीनिमित्त २० ऑक्टोबर रोजी, बुद्ध पार्कमध्ये हजारो बौद्ध अनुयायांनी कुटुंबासह गर्दी केली. या एक्स्पोमध्ये सम्राट अशोकांच्या धम्मप्रसारापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १९५६ मधील ऐतिहासिक धम्मदीक्षेपर्यंतचा सुमारे २००० वर्षांचा धम्मवारसा साकारण्यात आला आहे. यावेळी अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे आणि भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर यांनी एक्स्पोला भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले. त्यांचे स्वागत बौद्ध परंपरेनुसार पंचशील दुपट्टा अर्पण करून करण्यात आले.

युवकांना धम्माशी जोडण्याचा उद्देश हा उपक्रमामागील प्रमुख हेतू असल्याचे मुख्य आयोजक राकेश धारगावे यांनी सांगितले. हा एक्स्पो संपूर्ण टीमच्या सामूहिक मेहनतीचे फलित असल्याचेही त्यांनी नमूद केले. हा एक्स्पो २२ ऑक्टोबर पर्यंत बुद्ध पार्क, बुद्ध नगर, नागपूर येथे सुरू राहणार असून, नागरिकांनी कुटुंबासह भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

रिपब्लिकन चळवळ परिवार मोठा करण्यासाठी नव्हे, तर समाजाला दिशा देण्यासाठी : नारायण बागडे

स्वार्थी राजकारणामुळे रिपब्लिकन विचारधारेचे नुकसान; धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पूर्वसंध्येला नागपुरात राज्यव्यापी कार्यकर्ता मेळावा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सोन्याहून मौल्यवान असा रिपब्लिकन शब्द आपल्या समाजाला दिला. या शब्दामागे स्वाभिमान, स्वतंत्र राजकीय अस्तित्व आणि सामाजिक परिवर्तनाची व्यापक संकल्पना होती. बुद्धधम्म स्वीकारलेल्या समाजाने राजकीय स्वार्थासाठी कोणाच्याही ताटाखालचे मांजर बनून राहू नये, तर ताठ मानेने रिपब्लिकन झेंडा हाती घेऊन स्वतःचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व निर्माण करावे, ही बाबासाहेबांची अपेक्षा होती. मात्र, दुर्दैवाने रिपब्लिकन चळवळीचे नेतृत्व ज्यांच्या खांद्यावर सोपविण्यात आले, त्यांच्यापैकी काहींनी स्वतःच्या स्वार्थासाठी रिपब्लिकन विचारधारेचे मोठे नुकसान केले. रिपब्लिकन चळवळ ही एखाद्या परिवाराला मोठे करण्यासाठी नसून संपूर्ण समाजाला योग्य दिशा देण्यासाठी आहे, असे परखड प्रतिपादन आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी केले. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पूर्वसंध्येला नागपूर येथील विदर्भ साहित्य संघाच्या सभागृहात आयोजित राज्यव्यापी कार्यकर्ता मेळाव्यात अध्यक्षीय भाषण करताना ते बोलत होते. या मेळाव्याच्या माध्यमातून रिपब्लिकन चळवळीचे मूळ उद्दिष्ट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार, समाजाची एकजूट आणि स्वतंत्र राजकीय अस्तित्व निर्माण करण्याची गरज यावर भर देण्यात आला.

नारायण बागडे यांनी आपल्या भाषणातून रिपब्लिकन चळवळीच्या सद्यस्थितीवर भाष्य करताना नेतृत्वाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. रिपब्लिकन हा केवळ राजकीय पक्षाचा किंवा संघटनेचा उल्लेख नसून तो स्वाभिमान, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा वाहक आहे. बाबासाहेबांनी वंचित, शोषित आणि उपेक्षित समाजाला राजकीय ताकद मिळावी, त्याने स्वतःच्या हक्कांसाठी स्वतंत्रपणे उभे राहावे आणि कोणत्याही राजकीय शक्तीच्या दबावाखाली राहू नये, या व्यापक उद्देशाने रिपब्लिकन विचारांची पायाभरणी केली. मात्र, चळवळीच्या मूळ ध्येयापासून दूर जात व्यक्तिकेंद्रित आणि परिवारकेंद्रित राजकारणाला महत्त्व दिले गेले, तर समाजाच्या प्रश्नांना न्याय मिळणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली.

या मेळाव्याचे उद्घाटन ज्येष्ठ रिपब्लिकन नेते भाई तानसेन नन्नावरे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध लेखक उत्तमराव गायकवाड, महिला नेत्या डॉ. सुधा जनबंधू, आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे राष्ट्रीय महासचिव उद्धव तायडे आणि शिवाजी गच्छे उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी रिपब्लिकन चळवळीची वैचारिक बांधिलकी, संघटनात्मक एकजूट आणि समाजाच्या राजकीय सक्षमीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले.